गुरूवार, २२ फेब्रुवारी २०२४
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - १८३
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) THURSDAY 22 FEBRUARY 2024 adhunikkesari.com ●YEAR-03 ●ISSUE-183 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05




# सरकारला जेरीस आणण्यासाठी शनिवारपासून आंदोलन

## मनोज जरांगे पाटील : प्रत्येक गावात एकाच वेळी रास्ता रोको

आधुनिक केसरी न्यूज

**जालना : मराठा समाजाची मागणी इतर मागास वर्गातूनच (ओबीसी) आरक्षण मिळण्याची आहे. आमची फसवणूक झाली आहे, असे सांगत मनोज जरांगे यांनी पुढील आंदोलनाची दिशा स्पष्ट केली. येत्या २४ तारखेपासून मराठा बांधवांनी प्रत्येक गावागावात आंदोलन करावे. आपल्याला सरकारला जेरीस आणण्यासाठी आंदोलन करायचे आहे. त्यामुळे २४ तारखेपासून दरदिवशी साडे दहा वाजता प्रत्येक गावात एकाचवेळी रास्ता रोको करा. आता नेतेमंडळींचा आणि आपला संबंध नाही. त्यांना आपल्या दारात येऊ द्यायचे नाही, अशी आंदोलनाची दिशा मनोज जरांगे यांनी उपस्थित समाजबांधवांना सांगितली. त्याचवेळी आमच्या मुलांना जर त्रास झाला तर आम्ही जशास तसे उत्तर देऊ, असा इशाराही त्यांनी सरकारला दिला.**

आता गावागावील वृद्धांनी उपोषणाला बसावे, त्यांच्या जीवाचे बरेवाईट झाले तर सरकार त्याला जबाबदार असेल, असे सांगताना आम्ही लढण्यासाठी सज्ज आहोत, असा इशारा त्यांनी दिला. मराठा आरक्षणाचे विधेयक विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात मंजूर होताच मंगळवारी दुपारी मनोज पाटील जरांगे यांनी तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त करून, औषधोपचार, पाणी घेणे बंद केले, तसेच सलाईन तातडीने काढून टाकले. आज बुधवारी समाजबांधवांची बैठक बोलावून त्यांनी येथून पुढच्या आंदोलनाची दिशा स्पष्ट केली. दररोज सकाळी १०.३० वाजल्यापासून दुपारी १ वाजेपर्यंत आपापल्या गावात आंदोलन करायचे. पोलिसांना आंदोलनाची परवानगी मागा, परवानगी दिली तर उत्तम पण जरी परवानगी नाकारली तरी तुम्ही आंदोलन करा. ज्याला सकाळी जमले नाही त्याने सायंकाळी ४ ते ७ पर्यंत दररोज आंदोलन करायचे. परीक्षेच्या विद्यार्थ्यांना अडचण येता कामा नये. शांततेत आंदोलन करावे. कोणाची गाडी फोडायची नाही, जाळायची नाही पण ती गाडी पुढे जाऊ द्यायची नाही. आम्हाला पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन मनोज पाटील जरांगे यांनी केले.

**मनोज जरांगे तुझे १०० अपराध भरले : कीर्तनकार अजय बारसकर**

मनोज जरांगे पाटील यांच्या कुणबी प्रमाणपत्र मिळविण्यासाठीच्या लढ्यात सहकार्य करणारे कीर्तनकार अजय बारसकर यांनी आता मनोज जरांगे पाटील यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. आजवर ओबीसी नेते आणि राज्यातील काही मराठा नेते हे जरांगे पाटील यांच्या विरोधात भूमिका घेत होते. मात्र आता त्यांच्याच टीममधील एक व्यक्ती मनोज जरांगे पाटील यांच्या विरोधात गेल्याचे दिसत आहे. अजय बारसकर यांनी आज पत्रकार परिषद घेऊन मनोज जरांगे पाटील हेकेखोर असल्याचे आरोप केले. तसेच मागच्या दोन महिन्यापासून त्यांनी बंद दाराआड बैठका घेण्यास सुरुवात केल्याचाही आरोप बारसकर यांनी केला. तसेच जरांगे पाटील यांनी संत तुकाराम यांचा अवमान केला असल्याचाही आरोप बारसकर यांनी केला. कीर्तनकार अजय बारसकर पत्रकार परिषदेत म्हणाले की, मी मराठा समाजासाठी गेल्या अनेक वर्षांपासून कार्यरत आहे. मराठवाड्यात कुणबी शोधण्यासाठी मी अनेक वर्षांपासून प्रयत्न करत होतो. त्यामुळे मधल्या काळात मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाशी जोडलो गेलो. पण जरांगे पाटील यांच्यासह काम करताना त्यांची हेकेखोर वृत्ती हळूहळू समजू लागली. सरकारी अधिकाऱ्यांच्या बैठकांमध्ये मी जरांगे पाटील यांना मसूदा वाचून त्यातील बारकावे लक्षात आणून देण्याचे काम करत होतो. एकदा त्यांनी माझा महाराज असा जाहीर उल्लेखही केलेला आहे. पण त्यांचे खरे रुप समोर आल्यामुळे मी आता जनतेसमोर येऊन सत्य सांगण्याचा प्रयत्न करत आहे.

# पुण्यात ड्रग माफियांना कुणाचा आशीर्वाद?

## वडेट्टीवार यांचा सवाल

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** विद्येचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्यात 2200 कोटींचे ड्रग्ज सापडले. सरकारच्या नाकर्तेपणामुळे पुण्याला ड्रग्जचा विळखा पडला आहे. महायुती सरकारच्या काळात ड्रग माफियांचा सुळसुळाट वाढला असून सरकारची डोळेझाक कशासाठी; ड्रग माफियांना कुणाचा आशीर्वाद आहे, असा संतप्त सवाल विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.

वडेट्टीवार म्हणाले की, पुणे पोलिसांच्या इतिहासातील सगळ्यात मोठी कारवाई मागील दोन दिवसांत झाली आहे. पुणे पोलिसांनी पुण्यातून जवळपास 2200 कोटींचे ड्रग्ज जप्त केले आहे. पुणे पोलिसांनी पुणे, विश्रांतवाडी, कुरकुंभ, दौंड आणि राजधानी दिल्लीमध्ये कारवाई केली. पण पुण्यातील ड्रग्जची व्यप्ती आणखी मोठी असल्याचे बोलले जात आहे. तरीही सरकार ड्रगच्या समूळ उच्चाटनासाठी धडक कारवाई करत नाही. सरकार डोळेझाक करत आहे.

राज्यातील तरुणाईला वाचविण्यासाठी ड्रग माफियांचा सरकारने वेळीच बंदोबस्त केला पाहिजे. सरकारने धडक कारवाई करून जरब बसविली पाहिजे. अन्यथा हे ड्रग माफिया तरुणाईला देशोधडीला लावतील. सरकारने याकडे डोळेझाक करू नये. ज्यांच्या आशीर्वादाने ड्रग रॅकेट सुरु आहे त्यांच्या देखील मुस्क्या सरकारने आवळल्या पाहिजेत. सरकारने ड्रग प्रकरण गांभीर्याने घेऊन दोषींवर कडक कारवाई करावी अशी मागणीही वडेट्टीवार यांनी केली आहे.

# भारताला धक्का! केएल राहुलनंतर बुमराह चौथ्या कसोटीतून बाहेर!

## केएल राहुल दुखापतीमधून सावरला नसल्यामुळे चौथ्या कसोटी सामन्याला मुकणार

आधुनिक केसरी न्यूज


इंग्लंडविरोधातील कसोटी मालिकेत भारताला आणखी दोन मोठे धक्के बसले आहेत. केएल राहुल दुखापतीमधून सावरला नसल्यामुळे चौथ्या कसोटी सामन्याला मुकणार आहे. त्याशिवाय जसप्रीत बुमराह सुद्धा चौथ्या कसोटी सामन्यात खेळणार नाही. बीसीसीआयनं केएल राहुल आणि जसप्रीत बुमराह यांच्याबद्दलचं अपडेट दिलं आहे. केएल राहुल दुखापतीमधून अद्याप सावरला नाही. तर जसप्रीत बुमराह याला चौथ्या कसोटीत आराम देण्यात येणार आहे, असे बीसीससीआयनं सांगितलं आहे. भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच कसोटी सामन्यातील तीन सामने झाले आहेत. इंग्लंडनं पहिल्याच कसोटी मालिकेत विजय मिळवत शानदार सुरुवात केली. पण त्यानंतर रोहितच्या नेतृत्वातील भारतीय संघाने जोरदार पलटवार दिला. विशाखापट्टणम आणि राजकोट कसोटी जिंकत भारताने मालिकेत आघाडी घेतली. पाच कसोटी सामन्याच्या मालिकेत भारताने 2-1 ने आघाडी घेतली. राजकोट कसोटी सामन्यात भारताने 434 धावांच्या मोठ्या फरकाने विजय मिळवला. आता 23 फेब्रुवारी रोजी रांची येथे चौथी कसोटी सामना होणार आहे. पण या कसोटीमध्ये जसप्रीत बुमराह आणि केएल राहुल हे अनुभवी खेळाडू दिसणार नाहीत. जसप्रीत बुमराहच्या अनुपस्थितीत वेगवान गोलंदाजीची धुरा मोहम्मद सिराजच्या खांद्यावर असेल. सिराजच्या जोडीला दुसरा वेगवान गोलंदाज म्हणून कुणाला संधी मिळते? हे पाहणं औत्सुयक्याचं असेल. मुकेश कुमार




आणि आकाशदीप असे दोन पर्याय रोहित शर्माकडे उपलब्ध आहे. या दोघांपैकी कुणाला संधी मिळेल, हे काही दिवसांतच समजेल. आकाशदीप पदार्पण करूणार का? की मुकेश कुमार याला संधी मिळणार? हे काही दिवसांत स्पष्ट होईल.

रांची येथे होणाऱ्या चौथ्या कसोटी सामन्यापूर्वी जसप्रीत बुमराह याला भारतीय चमूतून रिलिज करण्यात आलं आहे. इंग्लंडविरोधातील पाच सामन्याची कसोटी मालिकेचा वेळ आणि मागील काही दिवसांमध्ये जसप्रीत बुमराह यानं मोठ्या प्रमणात क्रिकेट खेळलेय, ते पाहून जसप्रीत बुमराहला रिलिज करण्यात आलेय. दरम्यान, केएल राहुल चौथ्या कसोटीतून बाहेर गेलाय. तो धरमशाला येथे होणाऱ्या अखेरच्या कसोटी सामन्यासाठी भारतीय संघासोबत जोडला जाईल. त्याची फिटनेस व्यवस्थित असेल तरच तो अखेरच्या कसोटी सामन्यात सहभाग घेईल. तिसऱ्या कसोटी सामन्यापूर्वी आराम देण्यात आलेला मुकेश कुमार रांची कसोटी सामन्यासाठी टीम इंडियात दाखल झालाय.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932




आधुनिक केसरी

आपल्या भावांसाठी कोणताही त्याग करण्याची त्याची तयारी आहे. भरताला तो आनंदाने राज्य देतो एवढंच काय पण जेव्हा स्वतः भरत त्याला परत घेऊन जाण्यासाठी वनात येतो, तेव्हाही राज्यमोह त्याला अडवू शकत नाही. ' रघुकुल रीत सदा चली आई, प्राण जाय पर वचन न जाई ' हे रघुकुलाचे ब्रीद आहे. आपल्या वडिलांना दिलेला शब्द पाळून आपण कृतार्थ होऊ या असे सांगून तो भरताला परत पाठवतो.
पती म्हणून सीतेवर त्याचे अपरंपार प्रेम आहे. तिच्यासोबतचा वनवास त्याला सुखावह आहे. मात्र जेव्हा रावण तिला पळवून नेतो, त्यावेळी तिच्या विरहाने कमालीचा शोकाकुल होणारा तो पती आहे. आपल्या प्रिय पत्नीखातर रावणासारख्या बलाढ्य शत्रूचे पारिपत्य करून तिला परत आणण्याची धमक त्याच्यामध्ये आहे. रामाच्या आयुष्यात भावना आणि कर्तव्य यांचा मोठा संघर्ष बघायला मिळतो. आपल्या प्रिय पत्नीवर प्रेम असतानाही राजा म्हणून केवळ लोकापवादासाठी तो तिचा त्याग करतो. पण तिचे आपल्यासोबत नसणे त्याच्यासाठी प्रचंड दुःखदायी आहे. सगळ्यांनी सांगितले तरी तो दुसरा विवाह करीत नाही. जेव्हा सीता भूमीत प्रवेश करते, तेव्हा सीतेच्या विरहामुळे प्रचंड शोकाकुल झालेला पती म्हणजे राम आहे.
जसं रामाचं सीतेवर प्रेम आहे, तसंच आणि तेवढंच उत्कट सीतेचं देखील रामावर प्रेम आहे. राम हा तिचा श्वास आहे. एका रामाशिवाय तिला काहीही प्रिय नाही. वनवासातील रामाबरोबरचा काळ हा तिच्या दृष्टीने स्वर्गसुखापेक्षाही अधिक सुखकर आहे. सगळ्या देवांना बंदी बनवणारा आणि तिला विविध प्रलोभनं दाखवणारा रावण तिला भुलवू शकत नाही. हनुमंत लंकेत जाऊन तिचा शोध घेतो आणि नंतर तिला आपल्यासोबत रामाकडे चालण्याची विनंती करतो, तेव्हा ती त्या गोष्टीला नकार देते. कारण एका रामाशिवाय अन्य कोणाचाही स्पर्श तिला नको असतो. राम आणि सीता ही प्रेम, त्याग आणि समर्पण यांची एक अजरामर कथा आहे. रामायणातील भावाभावांचे प्रेम तर किती उदात्त !



## आनंदी पहाट

## समजून देणारा व समजून घेणारा अधिक सक्षम

आधुनिक केसरी

आपल्या आयुष्यातील गेलेल्या क्षणांना आपण कितीही ठरवले तरीही विसरू शकत नाही. त्या गतकाळातील आठवणीचा प्रत्येक क्षण आपल्याला काहीवेळा नवी उभारी देत असतो, तर काहीवेळा नैराश्यात देखील घेऊन जात असतो. भूतकाळात घडलेल्या प्रत्येक घटनेचा, घडामोडीचा संबंध आपण आपल्या वर्तमानातील जीवनाशी जोडण्याचा केविलवाणा प्रयत्न नेहमीच करत असतो. जो गेला तो भूतकाळ होता, त्यांत किती गुरफटून राहायचे, ह्याचे कित्येकवेळा आपल्याला भानच रहात नाही. तो काळ आपण कितीही ठरवला, तरीही विसरूच शकत नाही. खरे म्हणजे भूतकाळात रममाण होण्यापेक्षा वर्तमानातील परिस्थितनुसार भविष्य उज्वल करण्याचा आपण प्रामुख्याने आणि प्राधान्याने विचार केला पाहिजे. आपण अनेकदा भूतकाळातून अंतर्मनाने बाहेर पडत नाही आणि वर्तमानातील आनंद मिळवू शकत नाही,



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

केवळ आपल्या नशिबाला आणि भविष्याला दोष देत बसतो. खरे म्हणजे, नशिबाच्या खेळामुळे नाराज होऊ नये. जीवनांत काहीही झालं तरी उदास होऊ नये. हातांवरच्या रेषांवर कधी भविष्य पाहू नये आणि विश्वासही ठेवू नये. कारण, भविष्य तर त्यांना देखील असते, ज्यांना हातच नसतात. आपल्या नशिबातले योग आपणच आणायचे असतात. त्यासाठी हातापेक्षा सकारात्मक विचार आवश्यक असतात. आपले विचार बदलेले तर नशीब बदलतेच. अनेकांच्या सल्ल्यांमुळे आपल्या मनांत संभ्रम निर्माण होत असतो. त्यामुळे आपली स्वतःची वैचारिक बैठक बिघडते; विचार, वर्तन आणि व्यवहारांत नकारात्मकता वाढत जाते. अशावेळेला मानसशास्त्रीय समुपदेशकाचा सल्ला मोलाचा ठरतो.



आधुनिक केसरी

## ओवी अभंगाचा | दास झालो ||

लागला अंतरी | ज्ञानाचा गोडवा ||
चैतन्यी पाडवा | निरंतर ||१||
शब्द तुकोबाचे | ज्ञानाईचे बोल ||
काय त्यांचे मोल | वर्णावे म्या ? ||२||
संसारी नदीला | संयमाचा घाट ||
ब्रह्मानंदी थाट | मौन सांगे ||३||
अज्ञानाच्या पोटी | भोगल्या यातना ||
मृगजळी दैना | काय सांगु ? ||४||
ज्ञानाने गावला | अर्थ जगण्याचा ||
ओवी अभंगाचा | दास झालो ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८


## निरुपण

आधुनिक केसरी

मुकें बधीर राखोंडें । थोटें चळलें आणी वेडें ।
पांगुळ कुरें आणी पावडे । या नांव आध्यात्मिक ॥४१॥
तारसें घुलें काणें कैरें । गारोळें जामुन टाफरें ।
शडांगुळें गेंगाणें विदरें । या नांव आध्यात्मिक ॥४२॥
दांतिरें बोचिरें घानाळ । घ्राणहीन श्रोत्रहीन बरळ ।
अति कृश अति स्थूळ । या नांव आध्यात्मिक ॥४३॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

इन्द्रिन मन अरु बुद्धि से,
जीव कर्म कर जोय ।
सो बन्धन जग पाश है, साधन मुक्ति न
सोय ।।१०।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल
अष्टम अध्याय) ०२/०८/१०
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
इंद्रिय, मन आणि बुद्धिने आत्मा जे कर्म करतो ते जगाच्या बंधनासाठी आहेत अर्थात बेडी (पाश) आहे. या कर्माच्या साधनांनी मुक्ती होत नाही. कर्मामुळे बंधन तर प्रभूच्या चेतन भक्तीमुळे मुक्ति होते. प्राकृतिक करणांद्वारे होणारी सर्व साधनं भौतिक आहेत. त्या साधनांद्वारे आत्म्याला सत्य सुख, ज्ञान किंवा आनंद मिळू शकत नाही.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## अनुमान निरसन

आधुनिक केसरी

राजहंस ज्या प्रमाणे दुध आणि पाणी वेगळे करतो त्याप्रमाणे आत्मबुध्दीचा स्वानुभवी पुरूष राजहंसासारखा असतो. तो सारं व असार बरोबर निवडून वेगळे करतो. देहबुद्धी ची माणसं डोमकावळ्या सारखी असतात.यासाठी स्थिर बुध्दी असणे गरजेचे असते. सतत संतवचनावर एकनिष्ठ विचार असणे व त्याप्रमाणे आत्मबुध्दीचा विस्तार करावा हे आजच्या काळात दासबोध अभ्यासकांनी लक्षात ठेवून त्याचा प्रसार केला पाहिजे. पिंडा प्रमाणेचं ब्रम्हांडाची रचना आहे अशी कल्पना करायची आणि आपल्या मनाला येईल तशी बोलून दाखवायची पण आपण बोलतो त्यास पुरावा कोणता आणि त्याचा अनुभव घ्यायचा कसा हे कोणी सांगत नाही. म्हणून *पिंडी ते ब्रम्हांडी हा अनुमान काढता येते. जसे भरमसाठ कल्पनेच्या जंगलात रहावे व चांगल्या माणसाने अशा निर्बिड अरण्यात जाऊ नये.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## अकर्तेपणाने नाम घ्यावे

आधुनिक केसरी

काही न करणे, आपण काही करीत आहो किंवा आपल्याला काही करावयाचे आहे असे न वाटणे, हाच परमार्थ. पण स्वस्थ बसायला लावणे ही तुरुंगात मोठी शिक्षा समजतात. देहाने, मनाने, एकसारखी चळवळ करण्याची आपल्याला सवय लागली आहे. देहाला स्वस्थ बसायला लावणे कठीण, मनाला स्वस्थ बसायला लावणे त्यापेक्षा कठीण, आणि देह कर्म करीत असताना मनाला स्वस्थ बसविणे हे अत्यंत कठीण. मनाला खरे म्हटले तर स्वास्थ्य हवे. पण ते मिळविण्याकरिता साधन करणे, म्हणजे प्रयत्न करणे, जरूर आहे. मनाचे स्वास्थ्य बिघडायला कारणे काय ती पाहू. पहिले, आपल्या इच्छेविरुद्ध गोष्ट होणे; दुसरे, आपल्या मागच्या बऱ्यावाईट कर्मांची आठवण होणे; आणि तिसरे, उद्याची काळजी करणे. जो तो आपल्या इच्छेप्रमाणे व्हावे असे म्हणणार; सर्वजण तुमच्याच इच्छेप्रमाणे कसे वागतील ? तुमच्या इच्छेविरुद्ध गोष्टी होणारच. तेव्हा स्वास्थ्य बिघडू न द्यायला, आपली इच्छाच नाहीशी करावी. कोणतीही वस्तू मिळावी ही



बुद्धी नाही ठेवू. हाव सोडावी. लोकांची आस सोडावी. अभिमान सोडून कर्म करीत राहावे. प्रयत्न करून यश आले नाही म्हणजे दुःख होते, स्वास्थ्य बिघडते; मी केलेच नाही म्हटले म्हणजे कुठले दुःख ? प्रयत्न करून जे काही होते ते रामाच्या इच्छेने झाले म्हणावे. प्रत्येक गोष्ट रामाने केली म्हणणे म्हणजे भगवंताच्या अखंड अनुसंधानात राहणे. हे साधण्यासाठी अखंड नामस्मरण करावे. जे झाले, जे होते आहे, आणि जे होईल, ते भगवंताचेच आपल्या हिताकरिता करणे आहे, आपण कर्ते नाही, असे मानणे, याला अखंड भगवन्नामस्मरण पाहिजे. सारांश, जे जे काही झाले, ते ते भगवंतानेच आपल्या हिताकरिता केले. उद्याची काळजी भगवंतालाच आहे, त्याला काय योग्य वाटेल ते तो करील. म्हणून, झाल्याची म्हणजे कालची आठवण करू नये, होणाऱ्याची म्हणजे उद्याची काळजी करू नये, आणि चालू क्षण वाया जाऊ देऊ नये, नामस्मरणात राहावे. सगळ्या प्रपंचात खरी विश्रांती असेल तर ती नामस्मरणातच आहे. आहे त्या परिस्थितीत समाधान नसणे हा जो देहबुद्धीचा स्वभाव तो आपण सगळीकडे लावतो. सर्व गोष्टींचे ज्ञान होत नाही तोपर्यंत आपण काही करणार नाही, असे आपण म्हणतो; सर्व गोष्टींचे ज्ञान मरेपर्यंत आपल्याला होत नाही, आणि आपण काही करीत नाही ! देहबुद्धी आपल्याला भगवंताचा विसर पाडते. या देहबुद्धीवर आपण नामाच्या मंत्राचे पाणी शिंपडू या म्हणजे तिची वाढ होणार नाही. २८. मन परमेश्वराच्या ठिकाणी स्थिर करावे आणि देहाने प्रपंचाच्या गोष्टी कराव्यात.

## कल्याण स्वामी

आधुनिक केसरी

मूळच्या नाशिक परिसरातील कृष्णाजीपंत कुलकर्णी हे पहिल्या पत्नीच्या निधनानंतर तीर्थयात्रेसाठी कोल्हापूरला आले होते. तेथे पाराजीपंत (बरवाजीपंत) कुलकर्णी यांच्या रखुमाबाई नावाच्या बहिणीशी कृष्णाजीपंतांचा विवाह झाला. त्यांना ३ मुले झाली. पहिला म्हणजे, अंबाजी (जन्म शा.श. १५५८ म्हणजे इ.स. १६३६) व दुसरा दत्तात्रेय. या दोघांना एक बहीणही होती. रामदासस्वामी कीर्तनासाठी कोल्हापूरला आले असता पाराजीपंतानी आपली बहीण व तिच्या मुलांसह समर्थांचा अनुग्रह घेतला. त्यानंतर अंबाजी, दत्तात्रेय व त्यांच्या मातोश्री, समर्थांबरोबर तीर्थयात्रेस निघाले. वाटेत शिरगाव येथे समर्थांनी दत्तात्रेय स्वामींना मठ स्थापून दिला. ते व त्यांच्या मातोश्री तेथेच राहिले. अंबाजी मात्र पुढे आजन्म समर्थसेवेत राहिले.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
गुरूवार, २२ फेब्रुवारी २०२४
adhunikkesari.com

# 'खंडाळा तालुक्यातून मिंदे गट हद्दपार करणार'

## रामदास कांबळे : शिरवळ येथे तालुक्यातील शिवसेनेची युवा शक्ती एकवटली

आधुनिक केसरी न्यूज

सुशिल गायकवाड

लोणंद:शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे या पक्षाच्या वतीने आम्ही नूतन पदाधिकारी नेमण्याचं सत्र जोरदार पणे सुरू केलेले आहे.तालुक्यातील युवा वर्ग हा उध्दव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली काम करण्यास सज्ज आहे.त्यामुळे तालुक्यातील अनेक भागातून युवा नेतृत्वाना काम करण्याची संधी देण्यात आलेली आहे.उद्धव ठाकरे यांच्या विषयी युवा वर्गाकडून मोठी निष्ठा दाखविली जात आहे.आम्हा युवा पिढीला उद्धव ठाकरे यांचे नेतृत्व पाहिजे.असे खंडाळा तालुक्यातील युवा वर्गाला वाटत आहे.त्यामुळेच आज तालुक्यातून युवा वर्ग हा एकवटलेला आहे.युवा पिढीच्या शक्तीनेच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे हा जनतेच्या हितासाठी लढणारा पक्ष हा घरा घरात घेऊन जाणार आहोत.इतर पक्षांनी तरुणांचा वापर करुन तरूणांना देशोधडीला लावले.तरुणांना ताकत देणार आहे. तसेच तालुक्यातून मिंदे गट हद्दपार करणार असा विश्वास शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाचे सातारा जिल्हा समन्वयक रामदास कांबळे यांनी व्यक्त केला. युवा कार्यकर्त्यांची फळी निर्माण करण्यासाठी रामदास कांबळे व पक्षाचे पदाधिकारी विशेष प्रयत्न करत आहेत.शिरवळ ता.खंडाळा येथे तालुक्यातील युवासेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठया संख्येने एकत्रित आल्याने युवा पिढीची एक मोठी शक्ती एकवटल्याचे चित्र पाहायला मिळाले. युवा वर्गाची वाजत गाजत स्वागत रॅली काढण्यात आली.तत्पूर्वी शिरवळच्या शिवाजी चौकात छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करत रॅलीस प्रारंभ करण्यात आला.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाचा जयघोष करण्यात आला.

रेस्ट हाऊस येथे बैठक घेण्यात आली.यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा समन्वयक रामदास कांबळे,युवा सेनेचे जिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर (माऊली) पिसाळ,युवा सेना जिल्हा सचिव गणेश शिंदे,खंडाळा तालुका प्रमुख सागर कदम,शिरवळ शहर प्रमुख शहीद तांबोळी, संपत मगर,रियाज शेख,अजिंक्य डोके,महेंद्र भोसले आदींसह मोठ्या संख्येने उपस्थित असलेले युवा पदाधिकारी व कार्यकर्ते हजर होते.तालुका अधिकारी (पश्चिम) भागाचे मयुर कारळे, तालुका अधिकारी (पूर्व) भागाचे हरिश्चंद्र धायगुड, उपतालुका अधिकारी (पश्चिम) विभागाचे अभिषेक जाधव,खंडाळा शहर अधिकारी सुफियान सय्यद आदींच्या विविध पदांवर नियुक्त्या करण्यात आल्या. ह्या नियुक्त्या युवा सेनेचे जिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर



(माऊली) पिसाळ यांच्या हस्ते करण्यात आल्या. या निवडीबद्दल सर्वांचे अभिनंदन करण्यात आले. शिवाय निवडी करण्यात आल्याने सर्व नव नियुक्त पदाधिकाऱ्यांनी पक्षाचे विशेष आभार मानलेले आहेत.या बैठकीदरम्यान पक्ष संघटना सोबतच तालुक्यातील विविध समस्यांवर चर्चा करण्यात आली.जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.शिवाय शासन दरबारी किंवा अधिकारी वर्गा पर्यंत जनतेला न्याय मिळवुन देणारे सहकार्य केले पाहिजे.अशा भावना व्यक्त करण्यात आलेल्या आहेत.उद्धव ठाकरे यांच्या विषयी प्रामाणिकपणे निष्ठा जपत आपला पक्ष व पक्षाची ध्येय धोरणे पोहचविण्यासाठी आम्ही सर्व प्रयत्न करणार आहोत.असा विश्वास नूतन पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केलेला आहे.लोकांची निष्ठा शिवसेनेसोबतच आहे. शिवसेना हा पक्ष निष्ठेचा पक्ष आहे.शिवसेना उद्घव बाळासाहेब ठाकरे या पक्षावर लोकांचा विश्वास राहिलेला आहे.आम्हाला फक्त उद्धव साहेबांचे नेतृत्व पाहिजे.बाकी काही नको असा विश्वास लोकांनी व्यक्त केला असल्याचे रामदास कांबळे यांनी सांगितले.२० टक्के राजकारण आणि ८० समाजकारण करणे तसेच तरुणांच्या हाताला रोजगार देणे तसेच स्थानिकांची झुंडशाही मोडीत काढणे. पाण्याची व्यवस्था झाली पाहिजे.शेतकऱ्यांना पाणी मिळाले पाहिजे. अनेक गावे पाण्यापासून वंचित ठेवली जात आहेत. म्हणून यावर सुद्धा या बैठकित चर्चा करण्यात आले.



## श्रीसाई मतिमंद विद्यालयाची विद्यार्थिनी कु. श्रद्धा गणेश शिंगेचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** नांदेड येथील महासंस्कृती कार्यक्रमात लावणी नृत्य सादर करणारी श्री साई मतिमंद विद्यालयाची विद्यार्थिनी मतिमंद असलेली कु.श्रद्धा गणेश शिंगे यांनी लावणी नृत्य उत्कृष्ट सादर केल्याबद्दल नांदेड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी या विद्यार्थिनीस आपल्या कक्षामध्ये बोलावून स्मृतिचिन्ह व पत्र देऊन कौतुकाची थाप व सत्कार केला. या प्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, सहशिक्षिका पुजा डांगे मॅडम, दैवशाला पेंढारकर, पल्लवी चिटकुलवार, सहशिक्षक नागेश कांजाळकर, नितीन देवकांबळे यांसह शिक्षक बांधव, कर्मचारी उपस्थित होते.

## जिंतूर सेलू तालुक्यातील शिक्षकांच्या रिक्त जागा तत्काळ न भरल्यास तीव्र आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज



**जिंतुर :**सेलू तालुक्यातील शिक्षकांच्या रिक्त जागा भरा असे निवेदन मा.आ.विजयराव भांबळे साहेब यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिले. जिंतूर व सेलू तालुक्यात शिक्षकांच्या अनेक जागा रिक्त असल्यामुळे पालकांचा ओढ खाजगी संस्थांकडे जास्त होत आहे व विद्यार्थी संख्या कमी होऊन जिल्हापरिषदच्या शाळेतील शिक्षक आणखी कमी केले जात आहेत. परिणामी विद्यार्थ्यांची गुणवत्ता कमी होत आहे. तसेच अनेक शाळांमध्ये शिक्षकांची संख्या अपुरी असल्याने गावातील पालक विद्यार्थ्यांना मजूर म्हणून ऊसतोडीसाठी सोबत घेऊन जात आहेत. यामध्ये जिंतूर तालुक्यात प्राथमिक शिक्षक ३४, माध्यमिक शिक्षक ११, पदवीधर शिक्षक ७८, मुख्याध्यापक १३ तर सेलू तालुक्यात प्राथमिक शिक्षक ३०, माध्यमिक शिक्षक ४, पदवीधर शिक्षक ४१, मुख्याध्यापक ११ अश्या एकूण २२२ शिक्षकांच्या जागा रिक्त आहेत त्यासाठी जिंतूर सेलू तालुक्यातील शिक्षकांच्या रिक्त जागा तात्काळ भरण्यात याव्यात, अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून ( मा.शरद पवार गट) तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा लेखी इशारा माजी आमदार विजयराव भांबळे साहेब यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद परभणी यांना दिला आहे.

यावेळी सोबत प्रसादराव बुधवंत, रामराव उबाळे, अजयभैया चौधरी, मुरली मते, रितेश काळे, गजानन कांगणे, नंदुभाऊ अंभोरे, राहुल घुले, गणेशराव घुगे इत्यादींसह पक्षाचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

## तहसील कार्यालयात लोकशाही दिनाकडे नागरिकांनी फिरवली पाठ

आधुनिक केसरी न्यूज

किसन पवार

कोपरगाव : आजकोपरगाव तहसील कार्यालयात तालुकास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले होते. मात्र नागरीकांची उपस्थिती नसल्याने व एकही तक्रार दाखल नसल्याने कार्यक्रम लवकर पार पडला असल्याची माहिती निवासी नायब तहसीलदार प्रफुल्लिता सातपुते यांनी दिली. सर्वसामान्य जनतेच्या तक्रारी / अडचणी यांची न्याय व तत्परतेने शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून 'लोकशाही दिन' जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त, विभागीय आयुक्त आणि मंत्रालय स्तरावर राबविण्यात येत असतो. तालुकास्तरावर देखील लोकशाही दिन राबविण्यात यावा असे शासनाचे विचाराधीन होते त्यानुसार महाराष्ट्र शासनाचे सामान्य प्रशासन विभागाने काढलेल्या परिपत्रक क्रमांक प्रसुधा २०११/ प्र.क्र.१८९/११/१८-अ दि.२६ साटेंबर २०१२ नुसार तालुका, जिल्हा, महानगरपालिका, विभागीय आयुक्त व मंत्रालय स्तरांवरील लोकशाही दिनाचे अंमलबजावणीबाबत एकत्रित आदेश पारित करण्यात आले.

लोकशाही दिनाच्या कार्यपध्दतीबाबत संदर्भाधीन परिपत्रकान्वये शासनाने वेळोवेळी मार्गदर्शक सूचना विहित केलेल्या आहेत. लोकशाही दिनासंदर्भात सर्व सूचना एकत्रितपणे निर्गमित कराव्यात व त्यासंबंधीची कार्यपध्दती सुलभ व्हावी, तसेच "लोकशाही दिन हा तालुका स्तरावर देखील राबविण्यात यावा त्यानुसार लोकशाही दिनाच्या कार्यवाहीबाबत जिल्हाधिकारी यांनी पत्र क्र. साशा/कार्या/लो.दि./९८९/२०१८ दि. १२ जूलै २०१८ रोजी जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांना पाठवून शासन परिपत्रकान्वये प्रत्येक महिन्याच्या तिस-या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिन राबविण्यात यावा असे आदेशीत केलेले आहे. परंतु सदर परिपत्रकाची काटेकोर अंमलबजावणी होत नाही असे दिसून आले होते कारणमहिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरावर होणा-या लोकशाही दिनात प्राप्त होणारे तक्रारी अर्जामधील विषय हे बहुतांशी प्रमाणात तालुकास्तरावरच प्रलंबित असतात त्यावरुन असे दिसुन आले की तालुकास्तरावरील लोकशाही दिनामध्ये सदर तक्रारीचे निराकरण होताना दिसत नाही. त्यामुळे जिल्हास्तरावरील लोकशाही दिनातील तक्रारींचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे यापुढे दर महिन्याच्या तिस-या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिन आयोजित करावा व शासन परिपत्रकात नमूद केलेप्रमाणे सदर लोकशाही दिनास उपविभागीय अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी तसेच पाटबंधारे विभाग, कृषी विभाग, सहकार विभाग, बांधकाम विभाग, पाणीपुरवठा विभाग या विभागाचे तालुका स्तरावरील अधिकारी यांनाही हजर राहणेबाबत सुचना देण्यात याव्यात. प्रत्येक लोकशाही दिनास कार्यालय प्रमुख यांनी स्वतः हजर रहावे प्रतिनिधी पाठवू नये, काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित रहाणे शक्य नसलेस त्याबाबत संबंधित तालुक्याचे उपविभागीय अधिकारी यांची पुर्व परवानगी घ्यावी. लोकशाही दिन घेतलेबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयास तात्काळ सादर करावा. तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्येच जास्तीत जास्त तक्रारींचे निराकरण होणेसाठी कार्यवाही करणेची जबाबदारी संबंधीत उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांचेवर सोपवली आहे. तालुकास्तरीय लोकशाही दिन आयोजित न करणे किंवा त्याबाबत व्यापक प्रसिद्धी न देणे, अधिका-यांनी उपस्थित न राहणे किंवा लोकशाही दिनातील तक्रारीवर ३० दिवसांच्या आत कार्यवाही न करणे यासारख्या बाबी निदर्शनास आल्यास संबंधित अधिका-यावर नियमानुसार कारवाई करणेत येईल असे जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश असताना देखील गेल्या अनेक वर्षापासून लोकशाही दिन कोपरगाव तहसील मध्ये झाल्याचे पहावयास मिळाले नाही. लोकशाही दिन नियमानुसार तहसील कार्यालयात घेण्यात यावा यासाठी तालुक्यातील मढी खुर्द येथील एक सूजाण नागरिक दत्तात्रय गवळी यांनी वेळोवेळी याबाबत शासनाकडे पाठपुरावा केला आहे.

आजच्या दिवशी तहसीलदार संदीप कुमार भोसले यांना लोकसभा निवडणुकी संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर येथे तातडीची बैठक असल्यामुळे ते उपस्थित राहू शकले नाही त्यामुळे निवासी नायब तहसीलदार प्रफुल्लिता सातपुते यांनी लोकशाही दिनाचे कामकाज पार पाडले यावेळी गोदावरी डावा कालवा शाखा अभियंता, जलनिस्सारण उपविभागीय अभियंता, वीज वितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता व कनिष्ठ अभियंता तसेच जलसंधारणाचे अधिकारी एवढेच अधिकारी उपस्थित होते बाकी अधिकाऱ्यांची अनुपस्थिती राहिल्यामुळे त्यांना नोटीस पाठवण्यात येईल असे निवासी नायब तहसीलदार यांनी सांगितले.

## डी. राजांचे मोदींना आव्हान

आधुनिक केसरी

देशातील विद्यमान सरकारची वाटचाल पाहता देशात लोकशाही, प्रजासत्ताक आणि राज्यघटना धोक्यात आले आहे. त्यापासून देशाला वाचवण्यासाठी आमचे सर्वात पहिले उद्दिष्ट हे भाजपला पराभूत करणे राहील. यासाठी आम्ही इंडिया आघाडी सोबत आहोत, असे मत भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे महासचिव माजी खासदार कॉम्रेड डी राजा यांनी व्यक्त केले. प्रसार माध्यमांशी बोलताना ते म्हणाले, मोदींनी वास्तवात कोणताही विकास केलेला नाही. त्यांना आम्ही आव्हान देतो की त्यांनी लोकांच्या वास्तववादी जीवन मरणाशी निगडित मुद्द्यांवर बोलावे. देशाचा मानवी विकास निर्देशांकामध्ये देशाचा स्तर घसरला. भूक निर्देशांकमध्ये देश मागे आहे. गरीबी, बेरोजगारीमध्ये जनता होरपळत आहे. पत्रकारितेचे स्वातंत्र्य निर्देशांकामध्ये देखील देशात स्तर घसरला आहे. दिल्लीच्या सीमेवर शेतकरी आंदोलन करत आहेत. कारण मोदींची गॅरंटी होती की शेतकऱ्यांना एमएसपी कायदा पारित करतो. पण भाजप सरकारने पलटी मारली. शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली. स्वामीनाथन यांना भारतरत्न देण्याचे नाटक करणारे हे सरकार त्यांनी केलेल्या एमएसपी सारख्या शिफारशीवर कानाडोळा करत आहे. कोणतेही जमिनीवर मूलभूत काम न करता मोदी सरकार ढोंगी प्रचार करत आहे. ते लोकांची विचार करण्याची शक्ती हायजॅक करत आहेत, असा आरोप त्यांनी केला. मोदींचा कार्यकाळ हा विध्वंसकारी राहिला आहे. आम्ही देशातील सर्व धर्मनिरपेक्ष राजकीय पक्षांना आवाहन केले आहे की त्यांनी जनतेमध्ये जावे व मोदी सरकारच्या विरोधात लोकांना जागरूक करावे. काहीही करून भाजपला केंद्रामध्ये पराभूत करावे लागेल. देशातील घटनाकृत विविध स्वायत्त संस्थांच्यावर हल्ले होत आहेत, हस्तक्षेप होत आहे. निवडणूक आयोग हा भाजपचा प्रचार संस्थेसारखा काम करत आहे. आमच्या पक्षाचे खासदार इंद्रजीत गुप्तांच्या नेतृत्वाखाली नेमलेल्या निवडणूक सुधारणा आयोग शिफारशीच्यांवर अजून देखील संसदेत चर्चा केलेली नाही. पण भारतासारख्या वैविध्य असलेल्या देशांमध्ये भाजप आरएसएस हे "वन नेशन वन इलेक्शन" योजना लागू करू पाहत आहेत. भारतीय कम्युनिस्ट पक्षाचा याला विरोध आहे. ईव्हीएम शिवाय मतपत्रिकेवर देशात निवडणूक घेण्याची आमची मागणी आहे. मोदी म्हणतात सबका साथ सबका विकास. पण मोदींची कोणाबरोबर साथ आहे? महिला, युवक, शेतकरी, कामगार यांच्या प्रश्नांच्याकडे दुर्लक्ष करून सबका साथ सबका विकास कसे म्हणता येईल.



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592


## नवभारताचे द्रष्टे युगपुरुष : गोळवलकर गुरुजी

आधुनिक केसरी

**सरसंघचालक गोळवलकर गुरूजी यांचे विचार व कार्य काळाच्यापुढे झेपावणारे होते. त्यांच्या प्रत्येक भाषणातून व लेखनातून उद्याच्या बलशाली भारताचा ध्यास स्पष्ट होतो. विचारधन हा त्यांचा ग्रंथ अजोड आणि अतूलनीय आहे. त्यातील एकेक वाक्य देशाच्या उज्ज्वल भविष्याबाबत विचारमंथन घडविणारे आहे. संघकार्य हेच राष्ट्र कार्य आहे आणि नित्यशाखा हा स्वयंसेवकाचा जीवनधर्म आहे असे ते मानत असत.**

संघकार्याचे अवलोकन व रसग्रहण करून या संघटनेत आपणांस पुढे चालून भरीव कार्य करावयाचे आहे असा संकल्प त्यांनी केला. १९३१ साली डॉ. हेडगेवार बनारसला गेले असताना ऋषितुल्य तपस्वी अशा प्रतिभाशाली तरूणाकडे पाहून मनोभावे आकर्षित झाले. केशव - माधवाची ही भेट म्हणजे जिवा - शिवाचे ऐक्य होते. पहिल्या भेटीतच गुरुजींचे व्यक्तिमत्व डॉक्टरांच्या मनावर ठसले. पूजनीय डॉ. हेडगेवार नागपुरला परतले आणि त्यांनी गोळवलकरांना पुढील वाटचालीसाठी दिशा दिली. आपण तरुण आहात. आता विज्ञानाबरोबर कायद्याचे शिक्षण घ्या, असा प्रेमाचा सल्ला दिला. कायद्याच्या शिक्षणामुळे त्यांना संघकार्यात नित्य जबाबदारी पूर्ण पाडताना मदत होईल. प्रतिष्ठा प्राप्त होईल असे सूचित केले. १९३४ साली पूजनीय डॉक्टरांनी गुरुजींकडे नागपूर शहरातील मुख्य शाखेचे कार्यवाह पद सोपविले. पुढे गोळवलकरांनी कायद्याच्या अभ्यासाचा सराव सुरू केला. डॉक्टरांनी त्यांची अकोला येथील अधिकारी प्रशिक्षण शिबीराचे व्यवस्थापन करण्याच्या जबाबदारीच्या पदावर नियुक्त केले. हे दायित्व त्यांनी उत्तम प्रकारे व कुशलतेने पार पाडले.

**अध्यात्मिक मंथनाकडे कल:**
जीवनाच्या एका विशिष्ट वळणावर उभे असताना त्यांच्या मनाचा कल अध्यात्मिक जीवनाकडे वळू लागला. ऑक्टोबर १९३६ मध्ये गोळवलकरांचे मन विचलित झाले. आपण काहीतरी अद्‌भुत, अध्यात्मिक कार्य करावे असे त्यांना मनापासून वाटू लागले. लौकिक जीवनाचा त्याग करून आपण संन्यासी व्हावे असा विचार त्यांच्या मनात डोकावू लागला. संन्यासी व्हावे म्हणून पश्चिम बंगालमधील सरगाची येथील रामकृष्ण मिशन आश्रमाकडे त्यांची पावले पडू लागली. कायद्याचे शिक्षण व संघाचे काम सोडून ते स्वामी अखंडानंद यांचे परमशिष्य बनले. अखंडानंद हे रामकृष्णपरमहंस यांचे शिष्य होते आणि स्वामी विवेकानंदांचे भिक्षुबंधू होते. असा मोठा तपस्वी गुरु मिळाल्यामुळे, त्यांच्या परिसस्पर्शामुळे माधवराव गोळवलकरांच्या जीवनाचे सोने झाले. जानेवारी १९३७ मध्ये गुरुजींची साधना व तपश्चर्या पाहून अखंडानंदांनी त्यांना शिष्यत्व बहाल केले. त्यांना संन्यासाची दीक्षाही दिली परंतु त्यानंतर काही दिवसांनी लगेचच त्यांनी आश्रम सोडला. १९३७ मध्ये त्यांचे गुरु अखंडानंद यांनी जगाचा निरोप घेतला. त्यांनतर पुढे काय करावे असा प्रश्न होता. पुढील मार्गक्रमण शोधण्यासाठी त्यांनी नागपूर गाठले व पूजनीय डॉ. हेडगेवार यांचा सल्ला घेतला. नैराश्य आणि अनिश्चितता या अवस्थेत त्यांच्या पुढे अनेक प्रश्न उभे होते. नागपुरमध्ये परतल्यानंतर डॉ. हेडगेवारांनी असा सल्ला दिला की, संघाचे काम करून




त्यांनी भारतीय समाजाप्रती असलेले आपले दायित्व, जबाबदारी पार पाडण्याची ही सुवर्णसंधी आहे असे त्यांना आग्रहाने प्रतिपादन केले.

**संघाच्या नेतृत्वाची दिशा :** यानंतर पू. डॉ. हेडगेवार यांच्या मार्गदर्शनाखाली माधवराव गोळवलकर कार्य करू लागले आणि त्यांनी त्यांच्याकडून संघटनात्मक कार्याचे अनेक धडे गिरविले. नित्य शाखा हा संघकार्याचा आत्मा आहे. संघातील रचना, कार्यपद्धती व नियोजन याकडे गांभिर्याने लक्ष दिल्यास संघटना अधिक मजबूत होईल. भविष्यात हिंदू समाजात नवचैतन्य आणण्यासाठी संघकार्यावर अधिक भर दिला पाहिजे, हा डॉक्टरांचा मंत्र त्यांनी काया-वाचा-मने कृतीमध्ये आणला.
संघामध्ये सहभागी झाल्यानंतर डॉक्टरांनी त्यांना एकाहून एक मजबूत असे संघटनाचे धडे दिले. संघटन चातुर्याचे ठोस सिद्धांत सांगितले आणि आध्यात्मिक राष्ट्रवाद व समाजसेवा यातील सुवर्णमध्य कसा साधावा याचा वस्तुपाठ त्यांनी गुरुजींकडून स्विकारला. १९३७ ते १९३९ या दोन वर्षात गुरुजींनी अखिल भारतीय अधिकारी प्रशिक्षण शिबिराचा प्रभारी संघटक ही जबाबदारी उत्तम प्रकारे पार पडली. शिबिराच्या कार्यपद्धती जटिल व कठीण अनुशासन प्रणाली आणि काटेकोर नियोजन ही त्रिसूत्री पाळून त्यांनी आपली क्षमता सिद्ध केली. आपल्या कामाचे इतिवृत्त प्रामाणिकपणे आणि नित्य नियमाने ते डॉक्टरांना देत असत. आपली क्षमता सिद्ध करून ते कुशल संघटक बनले. नित्य कामाचा आराखडा, व्यवस्थापकीय जबाबदारीची निश्चिती, सार्वजनिक संभाषणाची कला, सतत वाचन व लेखन या संज्ञापन गुणांचा विकास करत त्यांचे नेतृत्व फुलले. एखाद्या कमलपुष्पाप्रमाणे त्यांनी आपले नेतृत्व कलाकलानी विकसित केले. १९३८ साली त्यांना गणेश दामोदर सावरकर यांनी लिहिलेल्या 'राष्ट्रमिमांसा' या ग्रंथाचे इंग्रजीमध्ये भाषांतर करण्यास सांगण्यात आले. बनारस हिंदू विद्यापीठात शिकत असताना त्यांचे वाचन दांडगे होते. त्यामुळे इंग्रजी भाषेवर त्यांची विलक्षण पकड होती. क्रांतिवीर विनायक दामोदर सावरकर यांचे गणेश सावरकर हे बंधू होते. त्यांच्या राष्ट्रमिमांसा ग्रंथाचे हिंदी व इंग्रजीमध्ये भाषांतर करण्याची जबाबदारी पू. डॉक्टरांनी त्यांच्यावर सोपविली. तेव्हा हे कार्य त्यांनी निष्ठेने व एकात्मभावाने पूर्ण केले. या भाषांतरास त्यांनी 'वुई और अवर नेशनहुड डिफाइन्ड' असे शीर्षक देऊन त्यांनी या ग्रंथाचा उत्तम इंग्रजी भाषेत आत्मा घडविला. हे केवळ भाषांतर नव्हते तर त्यामध्ये आध्यात्मिक संवादाची श्रेष्ठ उंची होती. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या हिंदुत्ववादी विचारसरणीची पद्धतशीर बैठक त्यांनी या ग्रंथामध्ये मांडली आहे. हे संक्षिप्त भाषांतर असल्याचा दावा त्यांनी प्रस्तावनेत केला आहे. परंतु मराठी भाषेतील राष्ट्रमिमांसा या ग्रंथाचा मतितार्थ त्यांनी उत्तम प्रकारे इंग्रजीत आणला. 'आम्ही किंवा आमचे राष्ट्र परिभाषित' या ग्रंथातील ज्यांचे तुलनात्मक अध्ययन असे स्पष्ट करते की, हे नुसतेच भाषांतर नव्हते तर तो एक नवा अविष्कार होता. पूर्वीच्या लेखकाच्या भाषेतून जे मर्म मांडले होते ते समजावून घेऊन नव्या पिढीसाठी प्रस्फुरित करण्याचा त्यांचा यशस्वी प्रयत्न होता. विशेषतः या ग्रंथातील नाझी समर्थक कल्पनांची वीण ही गुरुजींनी भक्कम केलेली होती. या ग्रंथावरून श्री गुरुजींचे विचार हिऱ्याला पैलू पाडावेत तसे सुस्पष्ट होते हे लक्षात येते.

**सरसंघचालक पदाकडे वाटचाल :**
१९३९ मध्ये संघाच्या गुरुदक्षिणा उत्सवात मुख्य उद्‌बोदन करताना पू. डॉ. हेडगेवार यांनी माधवराव गोळवलकर हे पुढील सरकार्यवाह असतील अशी घोषणा केली. त्यामुळे संघाच्या व्यवस्थेतील ते दुसरे सरकार्यवाह बनले. २४ जून १९४० रोजी त्यांच्या महानिर्वाणापूर्वी एक दिवस अगोदर डॉक्टरांनी माधवराव गोळवलकरांना पुढील नेता होण्यासाठी एक पत्र दिले. ३ जुलै रोजी नागपुरात पाच राज्यातील प्रांत संघचालक एकत्र आले होते. त्यावेळी डॉक्टरांनी एक निवेदन केले आणि आपला निर्णय घोषित केला. अनेक ज्येष्ठ कार्यकर्त्यांना मागे ठेवून गोळवलकर यांच्या निवडीमुळे संघकार्यकर्त्यांना धक्का बसला होता. परंतु डॉक्टरांनी गुरुजींची बुद्धिमत्ता, प्रतिभासामर्थ्य, प्रशिक्षणातील त्यांचे स्वारस्य आणि संघटन चातुर्य हे गुण ओळखून आपला उत्तराधिकारी म्हणून नेमले आणि अनेकांनी त्यांची ही निवड योग्य असल्याचे मान्य केले. यावेळी बाळासाहेब देवरस म्हणाले होते की, सरसंघचालक म्हणून गोळवलकरांच्या क्षमतेबद्दल अनेक अग्रणी नेते साशंक होते. परंतु डॉक्टरांनी अचूकपणे पारख करून गुरुजींची निवड केली व ही निवड सार्थ असल्याचे त्यांनी पुढे सिद्ध करून दाखविले. त्यांचा राष्ट्रमिमांसेवरील ग्रंथ नव्या प्रमेयाची नांदी ठरला. गुरुजींच्या यशाची ही एक गुरुकिल्ली होती. संघाची स्वतंत्रपणे वैचारिक बैठक तयार करण्यात गुरुजींचे मोठे योगदान होते. त्यांच्या निवडीचे मुख्य कारण म्हणजे स्वतंत्र प्रज्ञेचा व स्वतंत्र नेतृत्वाचा विकास हे होय. त्यांच्या पूर्वी लोक संघाकडे हिंदू महासभेची युवक आघाडी म्हणून पहात असत. पण ही चौकट बदलून संघाला स्वतंत्र व्यक्तिमत्व प्रदान करण्यात गुरुजींचे मोठे योगदान होते. तीन दशकांपेक्षा अधिक काळात संघाला नेतृत्व देणारे श्री गुरुजी हे एक विलक्षण रसायन होते. भारतातील नेहरू युगात एक समांतर अशी देशभक्त तरूणांची संघटना अशी प्रतिमा गुरुजींनी निर्माण केली. चिनी आक्रमणानंतर प्रजासत्ताक दिनाच्या संचलनातसुद्धा संघाला निमंत्रित करण्यात आले. ही गुरुजींच्या कार्याची पावती होती. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे त्यांनी संघाची सभासद संख्या एक लाखाहून दहालाखापर्यंत वाढवली. संघास पूरक कार्य करणाऱ्या पन्नासहून अधिक आघाडीवरील राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि कामगार क्षेत्रातील काम करणाऱ्या विविध संघटनांचा विस्तार त्यांच्या काळात घडून आला. तसेच संघकार्य कामगार क्षेत्राप्रमाणेच इंग्लंड, अमेरिका इ. पाश्चात्य देशातूनही होऊ लागले. परदेशात ही संघटना हिंदू स्वयंसेवक संघ किंवा भारतीय स्वयंसेवक संघ म्हणून ओळखली जाऊ लागली.



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

## ज्ञानाचा मार्ग हाच निर्व्यसनी जीवनाचा पाया

आधुनिक केसरी

**प्रवासात चालकाची नजर हटली कि अपघात निश्चित असतो.तसच आपल्या जीवनातील जीवन मार्गावर मार्गक्रमण करताना असताना ज्ञान मार्ग धरला तर कोणत्याही प्रकारच व्यसन लागतं नाही.पण हा मार्ग सोडला तर मग मात्र व्यसन लागण्यासाठी फार वेळ लागत नाही. म्हणून ज्ञान मार्ग हाच जीवनाचा सुरक्षित मार्ग आहे.आपण ज्ञान मार्गावर असताना बहुतांश व्यसन हि आपल्या आजूबाजूला चुकुन सुद्धा फिरकत नाहीत.फिरकलीच तर आपली ते शिकार करू शकत नाहीत.आपली शिकार होऊ देयची नसेल तर आपला जीवन मार्ग हा ज्ञान सद्दश असला पाहिजे.मुळात निर्व्यसनी जीवन राहण्यासाठी आपलं जीवन सदैव ज्ञान मार्गावर मार्गक्रमण असल पाहिजे. सुख दुःखांचा समुद्र म्हणजे जीवन ,संकटाची मालिका आणि समस्यांची वादळं यामुळे जीवन वारंवार प्रभावित होत असतं.आणि याच दरम्यान अनेक बाह्य घटक मग आपला प्रभाव निर्माण करून आपल्यावर नियंत्रण मिळवत असतात.**

या मार्गाने आपण नशेच्या दिशेने प्रवास करतो. या सगळ्या मधून आपली सुटका फक्त आत्मज्ञान नेच होऊ शकते.आपल्या आजुबाजूला असणार वातावरण आपल्यवर काही परिणाम घडवून आणत असत.मुळात आपला परिसर,संगत, सहवास,आपला संपर्क,यावर बरंच काही अवलंबून असतं.या सगळ्या मध्ये महत्वाची बाब म्हणजे आत्मज्ञान आपल्या कडे किती या नुसार हा प्रभाव आपल्यावर परिणाम करत असतो. आपल्याला कोणत्याही खडतर कठिण रस्त्यावर,वाटेवर ,बिकट आति बिकट,आशा प्रसंगातून सही सलामत मार्गक्रमण करताना उपयोगी पडणार आत्म ज्ञान हे अमृत आहे . ज्यांच्या जवळ हे अमृत आहे. त्यांचं या सृष्टीवरील कोणतही विष विकार काहीच बिघडवु शकत नाही.सृष्टी वर जसं सकारात्मक शक्ति कार्यरत असतात तश्याच पद्धतीने नकारात्मक, विघातक शक्ती देखिल कार्यरत असतात.या विघातक शक्ती पासुन आपली सुटका करून घेण्यासाठी आपल्याकडे आत्मज्ञान असणं खूप गरजेचं आहे.म्हणून आपल्याकडं आत्मज्ञान असेल तर आपण कोणत्याही नशेच्या प्रभावात जाणार नाहीत.त्या मार्गावर धावणार नाहीत किंवा त्या दिशेने जाणार नाहीत.तशी वाटचालही कधीच करणार नाहीत. एवढी ताकद क्षमता आत्मज्ञानात आहे.महणुन आत्मज्ञान हाच नशा मुक्तिचा पाया आहे.नशा हि नशाच मग ती कोणतीही असो, सत्ता,पद ,पैसा,संपत्ती, प्रसिद्धी,किंवा याव्यतिरिक्त कोणतीही असेल.जीवनाची दिशा व दशा बदलणारी अवस्था म्हणजे नशा.सृष्टी वर असा कोणीही व्यक्ती नाही कि जो त्याची अंतरमनातुन नशेच्या गर्तेत जाण्याची इच्छा असते.पण वेळ, काळ, परस्थिती,याचा प्रभाव आणि वेळच्या अनुषंगाने झालेले अघात त्या दिशेने मार्गक्रमण करण्यासाठी खुणावतात आणि नेमकं याच वेळी आपल्याकडं आपल्या जीवनात घडणाऱ्या प्रत्येक घटना घडामोडी विषयी आवश्यक ते आध्यत्मिक ज्ञान असेल तर मग मात्र आपण नशेच्या मार्गावर धावणार नाही.कारण आपल्याकडं असणार्या समर्पक ज्ञानमुळे आपल्याला त्या दिशेने जाण्याची आवश्यकता भासणार नाही.नशा कोणतीही असो नशा हि जीवनाच्या विनशाची दिशा निश्चित करत असते.आणि या भयानक संकटातुन आपला बचाव व्हावा हि प्रत्येकाची मनोमन इच्छा असते. त्यावरील उपाय काय तर नशा मुक्ति साठी आत्मज्ञान हा एकमेव उपाय आहे.आणि ज्याने आत्मज्ञान आत्मसात केले त्याला कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही प्रकारची नशा करण्याची आवश्यकता भासणार नाही.म्हणुन आपण आत्मज्ञानाने समृद्ध असल पाहिजे.महणजे जीवनातील कोणतीही नशा तिचा प्रभाव आपल्यावर दाखवु शकणार नाही. नशा म्हणजे फक्त अंमली पदार्थ इथं पर्यंत मर्यादित अर्था नही तर एकंदरीत मानवी जीवनात एकच बाब पुन्हा पुन्हा वारंवार आपलं लक्ष्य केंद्रित करण. नशा म्हणजे सर्व साधारण पणे व्यसन किंवा सवय प्रत्येकाला कोणत्या तरी प्रकारचं व्यसन असतंच व्यसन किंवा सवय मुळात अनेक वेगवेगळ्या प्रकारची असते.आणि या सगळ्या प्रकारातील व्यसना पासुन आपली सुटका सहीसलामत करायची असेल तर आत्म ज्ञाना शिवाय तरूनोपाय नाही.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# तेरा करम है मौला, मावळा मी शिवरायांचा ये स्वराज्य है मेरा

आधुनिक केसरी

||हे राज्य अवघ्यांचे | सर्व जातीपातीने ते रक्षावे ||

*हे राज्य सर्वांचे आहे, स्वराज्य नावाची संकल्पना सर्वसामान्य जनता, बहुजन समाज यांच्या उद्धारासाठी निर्माण करण्यात आलेली असल्यामुळे ते लोक कल्याणकारी राज्य असून त्याचे रक्षण करणे सर्वांची जबाबदारी आहे. राजांचे राज्य हे रयतेचे राज्य, सर्वसामान्यांचे राज्य! म्हणून शिवाजी राजांचे ब्रीदवाक्य, ||हे राज्य अवघ्यांचे | सर्व जातीपातीने ते रक्षावे ||*

शिवाजी राजांचे राज्य हे केवळ हिंदूंचे राज्य होते, शिवाजी राजे मुस्लिमांचे कट्टर शत्रू होते, मुसलमानांचा कर्दनकाळ होते; असा खोळसाड अपप्रचार काही लोक स्वार्थी आणि संकुचित मानसिकतेने करीत आले आहेत आणि आजदेखील सततत्याने करीत असतात. जर वास्तविकता शिवाजी राजे मुस्लिमांचे शत्रू असते; तर अनेक मुस्लीम मर्द मावळ्यांनी स्वराज्यासाठी चाकरी का केली असती? शिवाजी राजांच्या सैन्यात प्राणाची बाजी लावणारे विविध अठरापगड जाती आणि मुस्लिम धर्माचे लोक होते. शिवाजी राजांचे राज्य धर्मांध मानसिकतेवर आधारित असते तर मुस्लीम समाजातील लोक शिवाजी राजांच्या भगव्या झेंड्याखाली कधीच लढले नसते.



**शिवाजी राजाचे घोडदळ :** सैन्यात सर्वात महत्वाचा भाग म्हणजे घोडदळ. उत्तम प्रतीचे घोडे खरेदी करणे, त्यांची निगा राखणे आणि घोड्यांना प्रशिक्षण देणे; यासाठी महाराजांचे स्वतंत्र खाते होते. गनिमी काव्याची सारी भिस्त या घोडदळावरच! यावरून अंदाज येऊ शकतो हे खाते किती महत्वाचे! या घोडदळाचा प्रमुख मोहम्मद सैस, एक मुसलमान! हो तेच मुसलमान ज्यांच्या देशप्रेमावर तुम्हाला शंका आहे. तेच मुसलमान ज्यांच्या विरोधाचे राजकारण म्हणजे हमखास सत्ताप्राप्ती! हो तेच मुसलमान जे आपन विविध उपाधि ने हिणविले जातात. घोडदळाला प्रशिक्षित करण्याची जबाबदारी याच मुसलमानांच्या पुत्र मोहम्मद सैसकडे होती. याच मोहम्मद सैसने संभाजी राजाला घोडस्वारीचे प्रशिक्षण देऊन घोडस्वारीत तरबेज केले होते. याच मोहम्मद सैसमुळे मराठ्यांचे घोडे स्वराज्य स्थापनेकरीता दौडू शकले. आजही असे कित्येक मोहम्मद सैस मुस्लीम समाजात आहेत, जे मानवतेसाठी सर्वकाही अर्पण करू शकतात. भारतरत्न ए. पी. जे. अब्दुल कलाम हे त्यातीलच एक! गरज आहे केवळ शिवाजी राजांच्या पारखी नजरेची, आहे का कोणी मावळा असा जो राजा शिवाजी राजांच्या नजरेनं मुस्लीम समाजाकडे पाहील?

**शिवाजी राजाचे आरमार :** शिवाजी राजांच्या आरमाराचे सर्व प्रमुख मुसलमान होते. त्यापैकी दर्यासारंग आणि दौलतखान यांचे नाव इतिहासकार आजही आदराने घेतात. या दोघा मर्द मुस्लिमांनी मिळून इंग्रजांना अरबी समुद्राचे पाणी पाजले आणि स्वराज्याच्या नौदलाचा दबदबा निर्माण केला. या दोघांव्यतिरिक्त इब्राहीम खान, सुलतान खान, दाउद खानसारखे नावाजलेले एकापेक्षा एक श्रेष्ठ नौदल प्रमुख मुस्लीम समाजाने राजा शिवाजींना दिले. या नौदल प्रमुखांनी इंग्रजांच्या पाच अजस्त्र जहाजांना समुद्राचा तळ दाखवून इंग्रजांच्या काळजाचे पाणीपाणी केले. इंग्रजांचे डोव्हर नावाचे जहाज जिंकून त्यावर स्वराज्याचे निशाण अभिमानाने फडकाविले. जेव्हा हिंदूंसाठी समुद्रप्रवास निषिद्ध होता तेव्हा समुद्राच्या छातीवर उभे राहून स्वराज्याच्या रक्षणासाठी आमच्या जिवाचीही परवा न करणारे आम्हीच मुसलमान होतो; ज्यांना तुम्ही आज दहशतवादी आणि देशद्रोही सारखी दुषणे लावता. अरे औरंगजेबांच्या विरुद्ध लढताना राजा शिवाजींनी कधी खासगीत तरी मुस्लिमांच्या प्रामाणिकतेवर संशय घेतल्याचा एकतरी पुरावा दाखवा. नसेल तर मग कोण्या एक दहशतवाद्यामुळे समस्त मुस्लीम समाजाला संशयाचा दृष्टीने का पाहता? हा कोणाचा आदर्श पाळता? राजा शिवाजींचा म्हणण्याची तर हिम्मत करूच नका.

**शिवाजी राजाचे तोफखाना प्रमुख :** जेव्हा स्वराज्याचा व्याप वाढू लागला, तेव्हा गडकोटावर तोफा पेरल्या जाऊ लागल्या. त्यावेळी शिवाजी राजांनी आपला तोफखाना ज्याच्या ताब्यात दिला ते इब्राहीम खान मुसलमानच होते. शिवाय शिवाजी राजांच्या सर्वच तोफखान्यांचे प्रमुख मुसलमान होते. तोफखाना म्हणजे राजा शिवाजींचे सामर्थ्यस्थळ. युद्धात हा तोफाखानच निर्णायक भूमिका बजावत असे. अश्या महत्वाच्या स्थळी शिवाजी राजांनी मुस्लिमांची वर्णी लावली होती. (पानिपत १७६१च्या लढ्यात देखील मराठ्यांचा तोफखाना प्रमुख इब्राहीम खान गारदी नावाचा एक मुसलमानच होता! सदाशिव भाऊचे प्राण वाचविताना त्यास वीरगती प्राप्त झाली.)

शिवाजी राजांनी मुस्लीम समाजाला केवळ लष्करातच सहभागी केले असे नाही तर अत्यंत महत्वाची पदे देखील देऊ केली; अभूतपूर्व असा विश्वास टाकला मुस्लीम समाजावर आणि मुस्लीम समाजाने तो विश्वास सार्थ करून दाखविला. शिवाजी राजांच्या सैन्यात जितके स्वकीय मुस्लीम होते तितकेच किंवा संख्येने अधिक परकीय मुस्लीमदेखील होते. सिद्दी हिलाल, सिद्दी इब्राहिम, सिद्दी वाहवाह हे सर्व परकीय मुस्लिम, यमनहून आलेले. स्वराज्यातील एकही मुस्लीम मावळा असा नाही ज्याने शिवाजींशी विश्वासघात केला असावा. असेल तर दाखवा पुरावा!

**शिवाजी राजाचे प्रशासन :** शिवाजी राजांनी मुस्लिमांना केवळ लष्करातच सहभागी केले असे नाही तर प्रशासनात देखील सहभागी करून घेतले. स्वराज्याचा सर्व गुप्त व्यवहार आणि परराष्ट्र विषयक कारभार सांभाळण्याची विश्वसनीय कामगिरी अरबी व फारसी भाषेत निष्णांत असणाऱ्या मौलाना काजी हैदर या मुस्लीम धर्मगुरुवर सोपविली. शिवाजी राजांची राजमुद्रादेखील त्यांच्याच स्वाधीन करण्यात आली. ही काही साधारण बाब नव्हे! गुप्त व्यवहार आणि परराष्ट्र विषयक खाते म्हणजे स्वराज्याची सर्व शक्तीस्थळे आणि मर्मस्थळे याची माहिती असणारे खाते. इतक्या महत्वाच्या खाती एक मुस्लीम मौलानाच्या हाती देण्याचे काम राजांनी करून दाखविले. याचे गांभीर्य एक सुरक्षा व्यवस्थेशी संबंधित व्यक्तीच समजू शकतो. मुस्लीम व्यक्ती, तोही धर्मपरायण मुस्लीम व्यक्ती विश्वासघात करणारच नाही याचा किती भयंकर विश्वास राजांना! हा विश्वास सार्थच ठरला. राजांच्या विश्वासाचे चीज करणाऱ्या मौलाना काजी हैदरवर राजांनी आणखीन एक महत्वाची जबाबदारी सोपविली. ती म्हणजे स्वराज्याचा सर न्यायाधीश होण्याची! होय, स्वराज्याचा पहिला सरन्यायाधीश होण्याचा मान एका मुस्लीम व्यक्तीस मिळाला, ही आमच्यासाठी गर्वाचीच बाब! इतका इतिहास समोर असूनही मुस्लीम द्वेषी राजकारणाला कसे बळी पडता तुम्ही? कोणी दिली ही शिकवण तुम्हास?

**शिवाजी राजांची मशीद :** शिवाजी राजांच्या सेवेत असंख्य मुस्लीम व्यवस्थापकीय, प्रशासकीय आणि लष्करी सेवेत होते. म्हणूनच त्यांच्यासाठी स्वराज्याच्या संसदेच्या, रायगडाच्या प्रांगणात शिवाजी राजांनी मशीद बांधली आणि आज मशीद पाडणारे आम्ही राजांचे सैनिक आहोत म्हणतात! हा शिवाजी राजांचा वैचारिक खून कधीपर्यंत सहन केला जाणार? मशिदीत जर देशद्रोहाची आणि दहशतवादाची शिकवण दिली जात होती तर राजांनी मशीद का बांधली? वास्तवाचे ज्ञान तुम्हास जास्त आहे की शिवाजी राजांना? तुम्हास मशिदीबद्दल संशय असल्यास द्या ना एखाद्या मशिदीस भेट आणि करा ना शहानिशा.

**शिवाजी राजांची सुरक्षा :** स्वराज्यासाठी काम करणारा एकही मुस्लीम कधी बेईमान झाला नाही. म्हणून राजांच्या विश्वासाला सर्वात जास्त हाच समाज पत्र ठरला. महाराजांचे ३१ पैकी २० अंगरक्षक मुस्लीम होते (म्हणजेच ६४.५%)! सिद्दी हिलाल, सिद्दी इब्राहीम आणि फराश मदरशहा (मदारी) तर सावलीप्रमाणे राजांच्या सोबत असायचे. मदारीच्या मृत्यूसमयी धाय मोकलून रडणारा शिवाजी राजा रायगडाने याची देही याची डोळा पहिला. अफजलखान भेटीच्या वेळी राजांच्या सोबत असणारा विश्वासू मावळा म्हणजे सिद्दी इब्राहीम. राजांच्या अत्यंत महत्वाच्या गाठीभेटी, चर्चात सिद्दी इब्राहिमचा सहभाग असायचा. आज तुम्हास का नाही मुस्लीम समाजावर विश्वास? स्वतःलाच विचारा हा प्रश्न. हाच का तुमचा मुस्लीम समाजाकडे पाहण्याचा दृष्टीकोन? आज शिवाजी राजे असते तर.

पन्हाळगडाच्या वेढ्यात सिद्दी हिलालने आपल्या पुत्रासह शिवाजी राजाच्या रक्षणार्थ प्राणाची बाजी लावली. राज्याभिषेकाला स्वकीयांकडूनच विरोध होत असताना मौलाना काजी हैदर, नूरखान बेग, सिद्दी इब्राहीम, सिद्दी हिलाल, सिद्दी वाहवाह, मदार फाराशहा (मदारी), खान मियाना, दर्या सारंग, दौलत खान, दाउद खान, हुसेन खान मियाना, सुलतान खान आणि मोहम्मद सैस सारखा स्वकीय आणि परकीय मुस्लीमांनी राजांना साथ दिली. शिवाजी राजे व्हाहेत हेच स्वपन उराशी बाळगून त्यांनी प्रामाणिकपणे चाकरी केली. वेळप्रसंगी आपले रक्त सांडून स्वराज्याचे पीक पिकवली. आजही असे असंख्य मुस्लीम मानवतेसाठी आपल्या जीवाचे बलिदान देत आहेत, देऊ शकतात आणि भविष्यातही देतील. गरज आहे केवळ शिवाजी राज्याचा दृष्टीकोनाची.!

ज़ैनुल आबेद्दीन शेख
मु. पो. डोणगाव ता. मेहकर जि. बुलडाणा
मो.9689683929

## पाणीमिश्रित पेट्रोल विकणाऱ्यावर कारवाई नाही

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**छत्रपती संभाजीनगर :** सिडको एन-७ जळगाव रोड येथील रिलायन्सच्या पेट्रोल पंपावर नोव्हेंबर २०२१ मध्ये पाणीमिश्रित - पेट्रोलची विक्री केली होती. प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेच्या अहवालातही पेट्रोलमध्ये पाणी असल्याचे स्पष्टपणे म्हटले आहे. तसा अहवालही प्रयोगशाळेने जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना पाठवला. मात्र, या विभागाकडून गेल्या ३ वर्षांपासून कारवाई करण्यास टाळाटाळ केली जात आहे. जळगाव रोडवरील रिलायन्स पेट्रोल पंपावर पाणीमिश्रित पेट्रोलची विक्री होत असल्याची - तक्रार रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (खरात) - जिल्हाध्यक्ष मनीष नरवडे यांनी जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांकडे केली होती.नरवडे यांनी १६ नोव्हेंबर २०२१ रोजी पेट्रोल पंपावर पेट्रोल खरेदी केल्यानंतर त्यांना पेट्रोलमध्ये पाणी असल्याचे निदर्शनास आले. या तक्रारीवरून जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी पुरवठा निरीक्षक विलास सोनवणे आणि कविता गिराणे यांना त्याच दिवशी पेट्रोल पंपावर तपासणीसाठी पाठवले. पुरवठा निरीक्षकांनी तिन्ही पंपातील पेट्रोलचे नमुने ओम रवींद्र कुलकर्णी आणि सचिन साळुबा जाधव या पंचांसमक्ष घेतले. तसेच ते पुरवठा निरीक्षक अनुराधा पाटील यांच्यामार्फत छावणीतील प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेकडे पाठवले. तक्रारदार नरवडे यांनी यासंदर्भात पाठपुरावा केला असता जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयाकडून न्यायवैद्यक प्रयोगशाळेचा अहवाल आल्यानंतर कारवाई केली जाईल, असे उत्तर दिले. त्यानंतर २६ ऑगस्ट २०२२ रोजी न्यायवैद्यक प्रयोगशाळेने अहवाल पाठवला.



**२ वर्षपासून अहवाल धूळ खात पडून :** प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेने २६ ऑगस्ट २०२२ रोजी जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना पाणीमिश्रित पेट्रोलबाबतचा अहवाल पाठवला. तरीही जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयाने अहवाल मिळालाच नसल्याचा बनाव केला. त्यामुळे तक्रारदार नरवडे यांनी माहिती अधिकारांतर्गत प्रयोगशाळेकडे याबाबतची माहिती मागवली असता प्रयोगशाळेचे सहायक संचालक मु. द. कनकुटे यांनी अहवालाची प्रत तक्रारदाराला दिली. लिपीक कवडे यांच्या हस्ते जिल्हा पुरवठा कार्यालयाला दुसऱ्यांदा अहवालाची प्रत पाठवली.

## माणुसकी समूहाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांची ३९४ वी जयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** सु-लक्ष्मि बहुद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने व माणुसकी वृद्ध सेवालय येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९४ व्या जयंती निमीत्त अभिवादन हर्सुल पोलिस स्टेशन च्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिता मिसाळ यांच्या हस्ते महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. कुमारी लक्ष्मी पंडित हिने शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित पोवाडा सादर केला. तसेच शिवजयंती निमित्त माणुसकी समुहाच्या वतीने पोलीसांचा शाल श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले.यावेळी हर्सुल पोलिस स्टेशन च्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिता मिसाळ मॅडम व पोलीस उपनिरीक्षक कृष्णा घायाळ साहेब, पो.कॉ. देशमुख साहेब व पोलीस स्टेशन कर्मचारी व माणुसकी वृद्ध सेवालयातील सर्व वृद्ध व समस्त गावकरी मंडळी मोठया संख्येने उपस्थित होते.



## डी.वाय.एस.पी. ठाकुरवाड यांनी रुचीचे कौतुक करून दिले रोख बक्षीस

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यात विविध ठिकानी शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सकाळी शिवाजी महाराज पुतळ्यास दुग्ध अभिषेक करून विविध कार्यक्रमास सुरवात करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सांस्कृतिक, वकृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धेसह विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करून मोठ्या उत्साहात शिवजयंती साजरी करण्यात आली. या वेळी रांगोळी स्पर्धेमध्ये चिकलठाण येथील रूची प्रमोद चव्हाण या मुलीने अफजल खानाचा वध या रांगोळीने सर्वाचे मने जिंकली या वेळी उपविभागीय पोलीस अधिकारी विजयकुमार ठाकुरवाड व पोलीस निरीक्षक बाळासाहेब भापकर यांनी सर्व रांगोळी बघीतल्यावर अफजलखानाचा वध ही रांगोळीचे विशेष आकर्षण ठरले व या पोलीस अधिकारी यांनी चक्क रुची चव्हाण या मुलीचे विशेष कौतुक करून रोख बक्षीस ही देण्यात आले या वेळी सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी नगरसेवक सुनील पवार, डॉ .सदाशिव पाटील, सुरेश चव्हाण, गोरख पाटील, राम पवार सिद्धार्थ निकाळजे, पोलीस हेड कॉन्सटेबल बाळासाहेब वाघ, सुरेश शिंदे, प्रमोद चव्हाण इत्यांदीनी रूचीचे कौतुक केले.



## भरधाव कारने पाच वर्षीय मुलाला चिरडले

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** शहरातील रस्ते अपघातांवर वाहतूक पोलिसांना नियंत्रण मिळविण्यावर अपयश येत असल्यामुळे अपघातांची मालिका सुरुच आहे. नवीन घटनेत एका भरधाव कारने रस्ता ओलांडणाऱ्या पाच वर्षीय मुलाला धडक दिली. त्या मुलाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. ही दुर्दैवी घटना सीआरपीएफ कार्यलयाच्या प्रवेशद्वार क्रमांक दोनसमोरील रोडवर घडली. कृष्णा पवन यादव (५, डिगडोह) असे मृत मुलाचे नाव आहे.

पवन यादव हे एमआयडीसीतील एका कंपनीत काम करतात. रविवारी सकाळी पवन हे पत्नी आणि मुलगा कृष्णा यांच्यासोबत गॅस सिलिंडर आणायला दुचाकीने गेले होते. सिलिंडरसाठी काही पैसे कमी पडत असल्यामुळे पत्नी कृष्णासह एटीएमकडे जात होती.



# शिवछत्रपती महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवावा

## बाप्पासाहेब झिंजूडे : महिला समुपदेशन केंद्रात शिवजयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**सिल्लोड :** शहर पोलिस स्टेशन येथील महिला समुपदेशन केंद्रात शिवजयंती निमित्ताने शिवछत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या थाटामाटात साजरी करण्यात आली.छत्रपती शिवाजी महाराज हे कुशल प्रशासक, युद्धनीती, राजनीती निपुण असे आदर्श लोककल्याणकारी राजे होते. आजच्या तरुणांनी छत्रपती शिवाजी महारज यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून कार्य करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन शहरचे पोलिस उपनिरीक्षक बाप्पासाहेब झिजूडे यांनी केले. महिला समुपदेशन केंद्रात शिवजयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंतीनिमित्त प्रारंभी शहर पोलिस ठाण्याचे बाप्पासाहेब झिंजूर्डे व उपनिरीक्षक मुंडे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.कार्यक्राची सुरुवात महाराष्ट्र राज्य गीताने झाली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विशाल पाईकराव यांनी केले.

यावेळी सिल्लोड शहर व ग्रामीण पोलिस स्टेशन चे रामानंद बोधवण, मनोज जाधव, सुनील तळेकर, शेषराव मोरे, मंगेश आरके, साबळे मॅडम, समतादुत ( BARTI ) उमाकांत बोर्डे, राज आहिरे,महिला समुपदेशन केंद्राचे समुपदेशक आरती जाधव, विशाल पाईकराव आदी कर्मचारी यांची व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

# सीएसएमएसएस येथे मूळव्याध, भगंदर, फिशर तपासणी व उपचार मोफत शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** कांचनवाडी येथील छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था संचलित आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालयातील शल्यतंत्र विभागातर्फे आयुर्वेद रुग्णालय शल्यतंत्र बाह्यरुग्ण विभाग येथे भव्य मोफत मूळव्याध, भगदंर व फिशर तपासणी व उपचार शिबिर आयोजित करण्यात आले आहे. सदर शिबिर गुरुवार व शुक्रवार दि. २२/०२/२०२४ व २३/०२/२०२४ रोजी सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत होणार आहे. यामध्ये मूळव्याध, भगंदर, फिशर यासारख्या आजारांसाठी मार्गदर्शन, मोफत तपासणी आणि उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. ज्या रुग्णांना गुद भागातून रक्तस्राव होतो, शौचास आग होते, गुदभागी कोंब लागतो, गुदमार्गातून पुयस्त्राव होते आदी लक्षणे आढळल्यास शिबिरामध्ये त्याचे निदान करून उपचार करण्यात येतील. शिबिरानंतर व्याधींवर आयुर्वेदिक पद्धतीने औषोधोपचार उदा. क्षारकर्म, रक्तमोक्षण जलौका व शस्त्रकर्म चिकित्सा अत्यल्प दरात केल्या जातील. शिबिरात अल्पदरामध्ये व्हिडिओ रेक्टोस्कोपी द्वारा तपासणी करून योग्य निदान करण्यात येईल. तसेच अल्पदरामध्ये रक्ताच्या तपासण्या देखील करण्यात येतील. ज्या रुग्णांना शस्त्रक्रिया आवश्यक असतील, त्यांना अल्पदरामध्ये शस्त्रक्रिया करण्यात येतील. शिबिरात मूळव्याध असणाऱ्या रुग्णांनी काय काळजी घ्यावी व कोणते पथ्य पाळावे. तसेच आहार व विहार कसा असावा. याबाबत डॉ. बी. एन. गडवे, डॉ. आर. एन. गुंडरे, डॉ. एस. व्ही. मोरे, डॉ. पी. व्ही. बोचरे, डॉ. ए. ए. सुळकेकर, डॉ. पी. एस. घोरपडे, डॉ. पी. एन. तेलंग्रे आदी तज्ञांमार्फत सविस्तर मार्गदर्शन केले जाईल. नाव नोंदणीसह उपचारासाठी खाली दिलेल्या नंबरवर ०२४०-२६४६४६४ संपर्क साधावा.

जास्तीत जास्त गरजू रुग्णांनी या शिबिराचा लाभ घ्यावा.असे आवाहन CSMSS आयुर्वेद महाविद्यालय आणि रुग्णालयाचे प्राचार्य डॉ. श्रीकांत देशमुख, उपप्राचार्य डॉ. जयश्री देशमुख आणि रुग्णालय अधिक्षक डॉ. नरेश निंबाळकर यांनी केले आहे.

# यंदाचे रमाई गणगोत पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज



**नांदेड :** त्यागमुर्ती रमाई विचारमंचाच्या वतीने दिले जाणारे २०२४ चे रमाई गणगोत पुरस्कार जाहीर झाले असून यात ज्येष्ठ विधिज्ञ विजय गोणारकर यांच्या मातोश्री तथा माजी उपजिल्हाधिकारी जळबाजीराव गोणारकर यांच्या धम्मपत्नी रुक्मिणीबाई गोणारकर, अहमदपूरच्या माजी नगराध्यक्षा सरस्वती कांबळे, साहित्यिक समीक्षक प्रज्ञाधर ढवळे यांच्या मातोश्री विष्णूबाई ढवळे, येथील जय अकॅडेमीच्या संचाललिका तथा साहित्यिक राज गोडबोले यांच्या धम्मपत्नी जयश्री गोडबोले यांच्यासह पद्मीनबाई कोकरे, सुंदरबाई कांबळे, सरोजाबाई कांबळे, पत्रकार अंकुश सोनसळे यांच्या मातोश्री वत्सलाबाई सोनसळे यांचा समावेश असल्याची माहिती रमाई विचार मंचाच्या वतीने देण्यात आली. रमाई गणगोत पुरस्काराचे हे पाचवे वर्ष असून दरवर्षी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सहचारिणी माता रमाई यांचा आदर्श घेऊन आपल्या कुटुंबाची जडणघडण करणाऱ्या महिलांना जवळा देशमुख येथील त्यागमुर्ती रमाई विचार मंचाच्या वतीने पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. मानचिन्ह, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, पदक पुष्पहार असे पुरस्काराचे स्वरूप आहे. सदरील पुरस्कार २४ फेब्रुवारी रोजी जवळा देशमुख येथे होणाऱ्या समारंभात सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येणार आहेत. या सोहळ्याला उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजक रमेश गोडबोले, कैलास गोडबोले, आनंद गोडबोले यांनी केले आहे.

# २५ - २६ फेब्रुवारीदरम्यान पावसाची शक्यता !

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** वातावरणात सातत्याने होणारा बदलाचा परिणाम ऋतुंवर होत असून बाराही महिने अवकाळी पावसाने राज्यात ठाण मांडले आहे. हिवाळ्यात यावर्षी थंडी जाणवलीच नाही. तर पावसाळ्यात जितका पाऊस झाला नसेल, तितका अवकाळी पाऊस मात्र बाराही महिने पडत आहे. दरम्यान, आता पुन्हा एकदा अवकाळी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांना फार मोठे नुकसान सहन करावे लागत आहे. यंदा हिवाळ्यात थंडीपेक्षा पावसाच्या दिवसांमध्ये वाढ झाली आहे. फेब्रुवारीच्या सुरुवातीला पावसाची हजेरी लागल्यानंतर आता महिना अखेरीस परत एकदा पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. उन्हाळ्यात तापणाऱ्या विदर्भाने हिवाळयात थंडीचा निच्चांक देखील नोंदवला आहे. मात्र, अधूनमधून गारठा जाणवण्याव्यतिरिक्त हिवाळ्यातील थंडीची मजा घेता आली नाही. जानेवारीच्या अखेरच्या टप्प्यात गारठा जाणवल्यानंतर फेब्रुवारीतही किमान काही दिवस थंडी राहील, अशीच अपेक्षा होती. मात्र, ती सपशेल खोटी ठरली. जानेवारीत तापमान नऊ अंशाच्या खाली गेले, पण त्यानंतर लगेच तापमान सामान्य झाले. आता तर कमाल तापमानासह किमान तापमानातही झपाट्याने वाढ होत आहे. आधूनमधून अवकाळी पावसाचे आगमन सुरूच आहे. दरम्यानच्या काळात सातत्याने चार ते पाच दिवस ढगाळ वातावरण होते. आतादेखील २५ व २६ फेब्रुवारी या कालावधीत अवकाळी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

# शाश्वत विकासासाठी तात्विक अधिष्ठानाची गरज : प्रा. डॉ. जुन्ने

आधुनिक केसरी न्यूज




**घनसावंगी :** छत्रपती शिवरायांनी आपल्या पराक्रमाने रयतेचे स्वराज्य निर्माण करून सामाजिक समतेची पायाभरणी केली. यामागे त्यांची ध्येयनिष्ठा,कर्तव्यनिष्ठा होती. म्हणजेच शाश्वत विकासासाठी तत्त्वज्ञानाचे वैचारिक अधिष्ठान असणे अत्त्यावश्यक आहे. असे प्रतिपादन संत रामदास महाविद्यालयातील आजीवन शिक्षण व विस्तार विभाग अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त विशेष व्याख्यान प्रसंगी प्रमुख व्याख्याते म्हणून गोदावरी महाविद्यालय अंबड येथील मराठी विभागाचे विभाग प्रमुख प्रा.डॉ.पुरुषोत्तम जुन्ने यांनी केले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र परदेशी होते. तर प्रबोधन मंचावर वरिष्ठ विभागाचे प्रा.उपप्राचार्य प्रमोदकुमार जायभाये, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. भगवान मिरकड, विभागाचे कार्यक्रमाधिकारी तथा कार्यक्रमाचे मुख्य संयोजक प्रोफेसर (डॉ.) गजानन अवचार यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते कुळवाडीभूषण छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी पुढे बोलताना डॉ. जुन्ने म्हणाले की,ज्या ज्या महापुरुषांनी आपल्या कार्यकर्तृत्वाने सामाजिक परिवर्तन केले अशा सर्व महापुरुषांचे जीवन चरित्र अभ्यासणे गरजेचे आहे. त्यामधून प्रेरणा घेऊन सद्यस्थितीमध्ये जी नकोशी असलेली राजकीय स्थित्यंतरे घडत आहेत या स्थित्यंतरांना पायबंद घालता येऊ शकतो. परंतु याचे मूळ हे सामाजिकते मध्ये आहे याकडे मात्र कोणीच फारसं गांभीर्याने लक्ष देत नाही. नाहीतर ज्या राज्याच्या नावामध्ये राष्ट्र सामावलेले आहे आणि ज्या राज्याला धर्म आहे. त्या महाराष्ट्रधर्माच्या जाज्वल्य इतिहासाकडे डोळेझाक झाली नसती. म्हणून आज प्रत्येकाने आपला महाराष्ट्रधर्म अर्थातच कर्तव्य निष्ठेने पार पाडण्याची गरज आहे. यावेळी आपल्या अध्यक्ष समारोपातून प्राचार्य डॉ.राजेंद्र परदेशी म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेच्या सुखाकरिता स्वकीयाशीसुद्धा लढा दिला. परंतु जनता सुखी झाली पाहिजे. हा त्यांच्या विचारांना त्यांनी खंड पडू दिला नाही. हे कार्य आजच्या परिस्थितीमध्ये अनन्य साधारण महत्त्वाचे असे आहे. कारण आज समाज हितापेक्षा स्वहिता साठी प्रत्येक जण धडपडत आहे. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विभागाचे कार्यक्रमाधिकारी तथा मुख्य संयोजक प्रोफेसर (डॉ.) गजानन अवचार यांनी केले. तर उपस्थितांचे आभार वरिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. प्रमोदकुमार जायभाय यांनी मानले. यावेळी कार्यक्रमास महाविद्यालयातील प्रोफेसर डॉ. राजेंद्र धाये, प्रोफेसर डॉ. राधेश्याम राऊत, प्रोफेसर डॉ. सुभाष पवार, प्रोफेसर डॉ.सुभाष जाधव, प्रोफेसर डॉ. शशिकांत पाटील,प्रा. डॉ. सर्जेराव ताठे, प्रा. डॉ. प्रशांत सोनवणे, प्रा. डॉ. भाऊसाहेब देवकर, प्रा. डॉ. अशोक मोटे, प्रा. मनोज गवळी, प्रा. अर्जुन डोईफोडे, प्रा. संजय राठोड, प्रा. रमेश होसुरकर, प्रा. सुधाकर झुंजुरे, प्रा. विवेक पाटील, प्रा. धोंडोपंत कुरळीकर, प्रा. संतोष अडाळे, प्रा. संगीता नाटकर,प्रा. रुपाली कुलकर्णी, प्रा जयश्री गोफणे आदींसह शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.



# शिवजयंतीनिमित्त सहभागी मुलांना प्रमाणपत्राचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** पाडळी येथे शिवजयंतीनिमित्त शालेय मुलाचे भाषण घेण्यात आले. शिव चरित्र व्याख्यान ठेवण्यात आले प्रसिद्ध व्याख्याते डॉ. संजय गायकवाड सर यानी व्याख्यान दिले व सहभागी मुलाना प्रमाण पत्र देण्यात आले कार्यक्रमास गावातील मान्यवर उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसचालन भरत काळे यांनी केले व आभार भाऊसाहेब आहेवाड यांनी मानले.

# भारत चावल योजनेअंतर्गत तांदूळ वाटप

आधुनिक केसरी न्यूज



**दौलताबाद :** बुधवार रोजी छत्रपती संभाजीनगर पश्चिम मध्ये करोडी येथे केंद्र सरकार आयोजित भारत चावल या योजने अंतर्गत २९ रू प्रती किलो ने तांदूळ वाटप करण्यात आले, या योजनेचे शुभारंभ झी टॉकीज फेम ह.भ.प. केंद्रे महाराज शास्त्री नांदेड यांच्या शुभ हस्ते करण्यात आले त्या ठिकाणी भजनी मंडळी व भाजप जिल्हा कार्यकारणी सदस्य राजू गोल्हार, शिवसेना विभाग प्रमुख मंगेश जाधव , उद्योगपती रामनाथ पा नवले, उद्योगपती सूर्यभान जाधव, ग्रा.पं. सदस्य सोमनाथ गोल्हार, संजय गावंडे महेश जाधव, शाम महाराज दवांडे, ऋषिकेश जाधव, कार्तिक जाधव, भारत जाधव, जनार्दन महराज जाधव, नामदेव महाराज नवले, सुभाष सोनवणे, विष्णु गायकवाड, गंगाधर परहाड, शिवनाथ जाधव,आणि गावातील अनेक गावकरी व पदाधिकारी उपस्थित होते.



# दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्या

## कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्याकडे मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** वेरूळ येथे शिवजयंती शिव सप्ताह निमित्त राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांचे खुलताबाद तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे वतीने जिल्हा उपाध्यक्ष दिनेश सावजी यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले व निवेदन देण्यात आले या निवेदनात असे म्हटले आहे की खुलताबाद तालुक्यातील महसूल व कृषी विभागामार्फत एकून चार मंडळे आहेत त्यापैकी खुलताबाद हे एक मंडळ दुष्काळग्रस्त अनुदानासाठी वगळण्यात आले असून ते मंजूर करण्यात यावे अशा मागणीचे निवेदन यावेळी देण्यात आले. यावेळी मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे आमदार सतीश चव्हाण जिल्हाध्यक्ष कैलास पाटील पंचायत समितीचे माजी सभापती महेश उबाळे सेवादलाचे तालुकाध्यक्ष बबन आवटे युवक शहराध्यक्ष आदीब शेख अनिल चव्हाण गजानन फुलारे अरुण तंबारे विनोद जाधव केशव जाधव रावसाहेब फुलारे भाऊसाहेब वाकळे सर जावेद शेख राजू पांडे मोहसीन भाई सरपंच ज्ञानेश्वर मतकर,ज्ञानेश्वर दुधारे,रामेश्वर कदम व तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

# मिरजमधील अनेक मुस्लीम कार्यकर्त्यांचा भाजप प्रवेश; बावनकुळे यांनी केले स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** मिरज महापालिकेचे माजी नगरसेवक साजिद अली पठाण, फारूक जमादार यांच्या नेतृत्वाखाली मिरजमधील मुस्लिम समाजाच्या अनेक कार्यकर्त्यांनी मंगळवारी भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांचे स्वागत केले. सांगलीचे पालकमंत्री सुरेश खाडे, आ.गोपीचंद पडळकर आदी यावेळी उपस्थित होते.

माजी नगरसेवक राजू गोपाल आचारी, सामाजिक कार्यकर्ते नितेश कांबळे, बजरंग दल मिरज शहर प्रमुख विनायक ठोंबरे यांनीही यावेळी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. श्री.फारूक जमादार यांची भाजपा प्रदेश अल्पसंख्याक मोर्चाच्या प्रदेश सचिवपदी नियुक्ती करण्यात आल्याचे भाजपा प्रदेशाध्यक्ष श्री.बावनकुळे यांनी यावेळी घोषित केले.

यावेळी प्रदेशाध्यक्ष श्री.बावनकुळे यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताला विकसित, आत्मनिर्भर देश बनविण्याचा संकल्प केला आहे. सर्व जाती धर्मियांच्या नागरिकांना साथीला घेत ' सब का साथ, सब का विकास सब का विश्वास' हा मंत्र प्रत्यक्षात आणला आहे. काँग्रेसने सत्तेत असताना मुस्लीम समाजाचा वापर मतपेढी म्हणून केला. काँग्रेस ने आजवर भाजपा विरोधात मुस्लीम समाजात गैरसमज पसरविण्याचे काम केले. मोदी सरकारने सर्व धर्मियांतील गरीबांच्या कल्याणाच्या योजना आखल्या आहेत. या गरीब कल्याणाच्या योजना मुस्लीम समाजातील गरजूंपर्यंत नेण्याचे काम फारूक जमादार आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी करावे, असेही श्री.बावनकुळे यांनी नमूद केले. सांगलीचे पालकमंत्री सुरेश खाडे यांनी सांगितले की, मिरजचा लोकप्रतिनिधी म्हणून काम करताना आपण सर्व धर्मियांना न्याय दिला आहे. विकास कामे करताना कोण कुठल्या धर्माचा आहे याचा विचार आपण कधीच केला नाही. भाजपामध्ये प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांचा पक्ष पातळीवर योग्य सन्मान राखला जाईल. या कार्यकर्त्यांच्या विश्वासाला तडा जाऊ दिला जाणार नाही, असेही श्री.खाडे यांनी सांगितले.





# प्रा. सतीश सोळंके यांना आदर्श शिक्षक पुरस्कार : मान्यवरांच्या हस्ते सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथील सह्याद्री इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज चे प्राध्यापक सतिश इंदरसिंग सोळंके यांना प्रगती संस्थेचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात आले.छत्रपती संभाजी नगर येथील प्रगती बहुउद्देशीय सेवाभावी संस्थांच्या वतीने देण्यात येणारा आदर्श शिक्षक पुरस्कार यंदाचा पुरस्कार प्रा.सतिश सोळंके यांना समाज कल्याण विभागाचे उपायुक्त जयश्री सोनकावडे यांच्या हस्ते देण्यात आला.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून छ.संभाजीनगरचे पोलिस निरीक्षक मिरघे,दामीनी पथकाचे प्रमुख कांचन मिरघे, वाहतूक शाखेचे सहा पोलिस निरीक्षक पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात आला.पुरस्कार मिळाल्या नंतर सोळंके यांचे चाहते नातेवाईक मित्रमंडळी महाविद्यालयातील सहकारी कर्मचारी यांच्या कडून अभिनंदन कौतुक सत्कार करण्यात येत आहे.

# जि.प. शाळेत शिवछत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यान

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत दिनांक 20 फेब्रुवारी 2024 वार मंगळवार रोजी अखंड हिंदुस्थानचे दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त निमित्त आपल्या जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सावळदबारा येथे शिव व्याख्याते , नाट्यभूषण पुरस्कार विजेते, मराठी चित्रपट बापाने गमावले मुलाने जमवले चित्रपट फेम, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक, माजी प्राचार्य, शिवश्री भगवानराव गायकवाड यांचे शिव व्याख्यान जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सावळदबारा येथे शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल राठोड सर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमाची सुरुवात सकाळी 10:30 वाजता छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्या नंतर शिव व्याख्याते भगवानराव गायकवाड यांचा सत्कार शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल राठोड सर , ग्रामपंचायत सदस्य मोहन भाऊ सुरडकर, उपसरपंच मो. आरिफ मो लुखमान यांनी शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन केला. यानंतर जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सावळदबारा शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल राठोड सर यांनी प्रास्ताविक पर भाषण केले. त्यानंतर लगेचच शिव व्याख्यानाला सुरुवात झाली. शिवव्याख्याते श्री भगवानराव गायकवाड यांनी शिवाजी महाराज यांच्या जन्मापूर्वीचा महाराष्ट्र, जिजामाता व लखोजीराव जाधव यांच्या विवाहाची माहिती दिली. मोगल सत्तेत महिलांवर होत असलेल्या अन्याय अत्याचाराविषयी , शेतकऱ्यांवर , कष्टकऱ्यांवर , सामान्य माणसं, 18 प्रकट जातीतील लोकांवर होणाऱ्या अत्याचार , शोषणा याविषयी माहिती सांगितली त्यानंतर जिजामाता यांनी शिवाई देवीला साकडे घालून महाराष्ट्रावर होत असलेल्या अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी हिंदवी स्वराज्य स्थापन करण्यासाठी शिवबाला जन्म दिला. बालशिवबावर तसे संस्कार केले शिवबांना शस्त्र व शास्त्र यात पारंगत केले. शिवबांनी 18 प्रकट जातीतील सर्व मावळ्यांना एकत्र आणून रायरेश्वराच्या मंदिरामध्ये स्वराज्य स्थापनेची शपथ घेतली व वयाच्या पंधरा वर्षापासूनच किल्ले घ्यायला सुरुवात केली. तोरणा गड जिंकून स्वराज्याचे तोरण बांधले. शिवरायांनी स्थापन केलेल्या लोककल्याणकारी राज्यकारभारा विषयी माहिती व शिवरायांनी स्थापन केलेल्या अष्टप्रधान मंडळ व नौदल याविषयी माहिती दिली. शिवरायांचे चारित्र्य व इतर धर्मियांविषयी शिवरायांची भावना स्पष्ट केली. शिवाजी महाराज हे कोण्या एका धर्माच्या विरोधात लढले नाही तर अन्याया विरोधात लढले. शिवाजी महाराज यांच्या सैन्यात अनेक मुस्लिम सैनिक मोठ्या मोठ्या पदावर कार्यरत होते. शिवरायांनी राबवलेल्या कल्याणकारी योजनांची माहिती सांगितली. शिवरायांच्या संपूर्ण जीवन चरित्राचे वर्णन थोडक्यात सांगितले. त्याचबरोबर अभ्यासाचे महत्त्व मुलांना पटवून दिले व चांगला अभ्यास करून सर्वोच्च पदापर्यंत पोहोचण्यासाठी शुभेच्छा दिल्या. सोबतच निर्व्यसनी राहून शरीर संपत्ती कमावण्यावर भर देण्यास सांगितले.

या कार्यक्रमासाठी उपसरपंच मो. आरिफ मो लुखमान, मोहनभाऊ सुरडकर , नॅशनल शाळेचे मुख्याध्यापक योगेश चोपडे, आरोग्य अधिकारी राजपूत साहेब, चव्हाण साहेब , गावातील जेष्ठ पत्रकार गोकुळसिंग राजपूत, गुलाबराव कोलते , पत्रकार जब्बार डी तडवी ,पत्रकार रहीम भाऊ , सावळदबारा शिवजन्मोत्सव समिती चे अध्यक्ष राहुल टीकारे, संदीप कोलते उपाध्यक्ष तसेच सर्व सदस्य, जिल्हा परिषद शाळेतील सर्व शिक्षक, विद्यार्थी व गावातील शिवप्रेमी व्याख्यानाला उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल चव्हाण सर यांनी केले तरी या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भागवत गायकवाड सर व गजानन गवई सर यांनी प्रयत्न केले. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्रीमती नीता हिरास यांनी केले.




# मोलखेडा गावात रयतेचे राजे छत्रपती यांना अभिवादन करून काढली मिरवणूक

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील मोलखेडा येथे ठिकठिकाणी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त गावातील प्रतिष्ठित नागरिक रवींद्र गायकवाड व समाजसेवक रामभाऊ रामचंद्र वारंगणे यांनी शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्हार घालून पूजा केली व तसेच मा. लोकनियुकत सरपंच मनीषाताई ज्ञानेश्वर वारंगणे, स्वातीताई इंगळे, वैभव पवार, अतुल इंगळे युवासेना अध्यक्ष,आनंदा वारांगणे सर, व गावातील शिवप्रेमी तरुण मित्र मंडळी, महिला,बाल गोपाल व गावातील सर्व समाज बांधव हनुमान मंदिर येथे आरती व पूजा साठी उपस्थित होते. आरती झाल्या नतर सजवलेल्या टक्टटर वाहणातून प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली. गावातील प्रत्येक घरासमोर सळा रांगोळी घालून ठीक ठिकाणीच्या चौकात महिलांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे ओक्षण करून पुजण केले. बाल गोपाल लानी वेश भूषा धारण करून मिरवणुकी मध्ये सहभाग घेतला होता.डिजेच्या तालामध्ये वाजत गाजत निघालेल्या भव्य अश्या मिरवणुक रॅलीत समस्त गावकरी सहभागी झाल्याने मोठ्या जलोषात जयंती साजरी करण्यात आली. ही मिवणुक ३ तासा पेक्षा जास्त सुरू होती. गावातील सर्व गावकरी, मंडळी, तरुण मित्र, याच्या सहकाऱ्यांने महाराजांची जयंती शांततेत पार पडली छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मिरवणुकीत कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये यासाठी फर्दापूर पोलिस ठाण्याचे सपोनि प्रफुल्ल साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली सावळदबारा बिट जमादार मिरखॉं तडवी,प्रकाश कोळी भरत कोळी यांनी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता अशी माहिती ग्रामपंचायत सदस्य अतुल इंगळे यांनी बोलताना सांगितले आहे.



# छत्रपती शिवाजी महाराज प्रत्यक्ष जगण्याचा प्रयत्न करावा

## रवींद्र पाटील : ग्रँडमास्टर शिफुजी शौर्य यांनी जिंकली हजारो युवकांची मने

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** ग्रँडमास्टर शिफुजी भारद्वाज आले, हजारो युवकांना बघीतले आणि जिंकले..! कमल स्पोर्टींग क्लब, चंद्रपूरच्या वतिने दि. १९ फेब्रुवारी २०२४ रोजी स्थानिक छत्रपती शिवाजी चौक येथे आयोजित शिवजयंती महोत्सवास हजारोच्या संख्येने उपस्थित असलेल्या युवक युवतींनी व आबालवृध्दांनी उभे राहून शिफुजी शौर्य यांचे जल्लोषपूर्ण वातावरणात व फटाक्यांच्या आतिषबाजीत स्वागत केले.

या शिवजयंती महोत्सवाला छत्रपती शिवराय, गोळवलकर गुरूजी व भारत मातेच्या प्रतिमेस अतिथींनी दीपप्रज्वलन, माल्यार्पण व शिवआरती करून सुरूवात करण्यात आली. या शिव जयंती महोत्सव कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर होते. व्यासपीठावर ग्रँडमास्टर शिफुजी शौर्य भारद्वाज, व्याख्याते रविंद्र पाटील, खुशाल बोंडे, माजी महापौर अंजलीताई घोटेकर, माजी उपमहापौर अनिल फुलझेले, कमल स्पोटींग क्लबचे जिल्हाध्यक्ष रघुवीर अहीर, समाजसेवी दामोदर मंत्री, विनोद शेरकी, श्यामल अहीर, प्रदिप किरमे, श्रीनिवास सुंचूवार, कमल कजलीवाले, राजवीर चौधरी, हर्षवर्धन अहीर आदी मान्यवर उपस्थित होते.

या प्रसंगी बोलतांना हंसराज अहीर म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवरायांच्या शेकडो जयंती, पुण्यतिथी साजरी झाली आहे. या चौकाच्या नामकरणास मान्यता मिळवित या चौकाला आज सुंदर, मनमोहक व म्युरलद्वारा महाराजांच्या शौर्याची गाथा कोरून या चौकाचे सौंदर्य वाढविले आहे. महाराजांचे जीवन व त्यांनी स्वराज्य स्थापनेसाठी केलेला पराक्रम आजच्या युवकांनी स्वतः मध्ये बानवून विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करून देशाची सेवा करावी असे आवाहन केले. अहीर यांनी शिफूजी शौर्य यांच्या धाडसाचे कौतूक करून त्यांच्या राष्ट्र सेवेबद्दलही गौरवोद्गार काढले. याप्रसंगी शिफुजी शौर्य भारद्वाज यांनी उपस्थित हजारो युवकांशी संवाद साधत देशासाठी योगदान देण्याचे आवाहन केले. जगातील ७३ देशांमध्ये शिवछत्रपतींचा गौरव केला जातो असे सांगत छत्रपती शिवरायांच्या शौर्याच्या इतिहासातून बोधहित युवकांनी संयम, चारित्र्य, परिश्रम व राष्ट्रहितासाठी लढा देण्याचा संकल्प करून स्वतःला देशाकरीता समर्पित करण्यास सज्ज व्हावे असे आवाहन केले. व्याख्याते रविंद्र पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकून महाराजांनी आपल्या राज्यात गद्दार व फितुरांना कधीच थारा दिला नाही.महिलांप्रति त्यांचे विचार महान होते. ते प्रत्येक स्त्रीयांमध्ये माता व भगीनींचे रूप बघायचे अनेक गद्दारांना कठोर शिक्षा देवून त्यांच्या अपराधांचा हिशेब केला. त्यामुळे शिवाजी महाराजांचे चरित्र वाचून किंवा समजून घेण्याने महाराजांची महती कळणार नाही तर त्यांचे विचार जगण्याची, स्वतामध् ये उतरविण्याची गरज पाटील यांनी प्रतिपादीत केली. त्यांनी याप्रसंगी महाराजांच्या अनेक पैलूंना स्पर्श करीत महाराजांची महती सांगीतली. बाजी प्रभु देशपांडे म्हणाले होते की, लाख मेले तरी चालतील परंतू लाखाचा पोशिंदा जगला पाहीजे. राजामुळे अस्तित्व व किंमत आहे हे साऱ्या जगाने व महापुरूषांनी ओळखले मात्र हे चिरंतन सत्य आम्हांस कधी कळेल अशी विचारणा त्यांनी आपल्या संबोधनातून केली. आपल्या प्रास्ताविकात कमल स्पोर्टींग क्लबचे जिल्हाध्यक्ष रघुवीर अहीर म्हणाले की, मा. प्रधानमंत्री मोदीजी यांनी आत्मनिर्भर भारत साकार करण्यासाठी छत्रपती शिवरायांची प्रेरणा आवश्यक आहे. आजचा हा शिवजयंती महोत्सव याच उद्दात भावनेतून साजरा होतो आहे. युवकांनी महाराजांचा आदर्श दृष्टीपूढे ठेवून आत्मनिर्भर भारताच्या उभारणीसाठी योगदान द्यावे असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन  प्रा. श्याम हेडाऊ यांनी केले. यावेळी चंद्रपूर ते अयोध्या असा सायकलने प्रवास करणाऱ्या धनोटी (पोंभुर्णा) निवासी मयुर महादेवराव देऊरमले या युवकाचा ग्रँडमास्टर शिफुजी व मान्यवरांनी शाल, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देवून सत्कार केला. खुशाल बोंडे यांनी समारोपीय भाषणातून हंसराज अहीर यांच्या पुढाकारातूनच चंद्रपूरात शिवजयंती उत्सवाला सर्वप्रथम सुरूवात झाल्याचे सांगितले. या शिवजयंती महोत्सवाला हजारोच्या संख्येत युवक, युवती व विविध क्षेत्रातील नागरीक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राहुल गायकवाड, राजेश वाकोडे, जगदीश दंडेले, प्रणय डंबारे, मयुर भोकरे, विशाल गिरी, स्वप्नील मुन, आशय चंदनखेडे, प्रविण चुनारकर, विक्की लाडसे, सुभाष आदमने, प्रज्वल गिलबीले व अन्य सदस्यांनी परिश्रम घेतले.



# श्रीकांत शिंदेंसह उद्योगमंत्री सामंत धुळ्यात

## फलक अनावरणसह रस्ते कामांचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** राज्याचे मुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्यनेते एकनाथ शिंदे यांचे सुपुत्र संसदरत्न खा.डॉ.श्रीकांत शिंदे,राज्याचे उद्योगमंत्री ना.उदय सामंत हे उद्या धुळे दौऱ्यावर येत असून त्यांच्या हस्ते 40 कोटी रुपयांच्या निधीतून होणाऱ्या काँक्रीटीकरण रस्त्यांच्या कामाचा शुभारंभ धुळे जिल्ह्यातील शिवसेनेच्या पहिल्या जिल्हा संपर्क कार्यालयाचे उद्घाटन आणि शहरात शिवसेनेच्या 60 शाखांचे प्रातनिधीक उद्घाटन होणार असल्याची माहिती शिवसेना धुळे जिल्हा प्रमुख मनोज मोरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

खा.डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या धुळे दौऱ्याच्या पार्श्वभुमीवर मनोज मोरे यांनी त्यांच्या कार्यालयात पत्रकार परिषद घेतली. यावेळी शिवसेनेचे महानगरप्रमुख संजय वाल्हे, समाधान शेलार आणि पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी मनोज मोरे, म्हणाले की, खा.श्रीकांत शिंदे हे नंदुरबार जिल्ह्याच्या दौऱ्यावर असून हेलीकॉप्टरने विमानतळावर त्यांचे सकाळी 8 वाजता आगमन होईल. मोराणे बायपास मार्गाने ते विविध कार्यक्रमांच्या स्थळी उपस्थित राहतील. साक्रीरोडवरील सिंधूरत्न शाळेकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कॉक्रीटीकरणाचा कामाचा शुभारंभ खा.शिंदे आणि ना. उदय सामंत यांच्याहस्ते होईल. 5 ते 10 वर्ष टिकतील असे गुणवत्ता पूर्वक  रस्त्याची कामे 40 कोटीतून होणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा 60 वा वाढदिवस नुकताच साजरा झाला. त्याचे औचित्य साधून यशवंत नगर,मोगलाई, नेहरु पुतळा मोगलाई, येथे शिवसेना शाखा फलकांचे उद्घाटनही या मान्यवरांच्या हस्ते होईल. एकूण 60 शाखांचे शहरात उद्घाटन केले जाणार असून वेळेच्या नियोजनानुसार 3 शाखांचे उद्घाटन होईल. त्यानंतर शिवसेनेचे मंत्री,लोकप्रतिनिधी पदाधिकारी यांच्याहस्ते दर आठवड्याला 5 ते 10 शाखां फलकांचे अनावरण केले जाईल. खा.डॉ.श्रीकांत शिंदे ,ना.उदय सामंत हे साक्रीरोडवरील नेहरु पुतळ्याजवळ आल्यानंतर तेथे 20 जेसीबींच्या मदतीने त्यांच्यावर  पुष्पवृष्टी करण्यात येईल. शिवसेनेच्या धुळे जिल्ह्यातील पहिले संपर्क कार्यालय संतोषी माता मंदिरानजीक महिला मंदिरच्या अलीकडे स्थापन करण्यात आले असून या कार्यालयाचे उद्घाटन खा.डॉ. श्रीकांत शिंदे  आणि ना.सामंत यांच्याहस्ते होईल. याच ठिकाणी छोटेखानी सभा देखील होणार आहे.

खा.श्रीकांत शिंदे यांचा हा दौरा शिवसैनिकांमध्ये प्रचंड उत्साह, नवचैतन्य निर्माण करणारा असून मोठ्या प्रमाणात उबाठा,राष्ट्रवादीसह इतर पक्षातील प्रमुख पदाधिकाऱ्यांचा शिवसेनेत प्रवेश सोहळा देखील होणार असल्याची माहिती मनोज मोरे यांनी दिली.

# जि.प. शाळेस मूल्यांकन समितीची भेट

आधुनिक केसरी न्यूज



**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या योजनेअंतर्गत जिल्हा परिषद शाळांना भेटी दिल्या जात आहेत.शाळेची संपूर्ण माहिती जाणुन घेतली जात आहे. फलटण तालुक्यातील गोवेकर वस्ती कोरेगाव केंद्र पाडेगाव फार्म या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेस तालुकास्तरीय मूल्यांकन समितीने भेट दिलेली असून विविध माहितीचा आढावा घेण्यात आला. महाराष्ट्र शासन दिनांक ३०/११/ २०१३ च्या शासन निर्णयानुसार १ जानेवारी २४ ते १५ फेब्रुवारी २४ या ४५ दिवसाच्या कार्यक्रमात राज्यात सर्व शाळांमध्ये या उपक्रमाचे आयोजन व अंमलबजावणी करण्याचे निश्चित करण्यात आले होते. या अभियानात १ विद्यार्थी केंद्रित उपक्रम शाळा व परिसराचे सौंदर्यकीकरण विद्यार्थ्यांचा विविध उपक्रमातील सहभाग, राष्ट्रीय एकात्मता, प्रोत्साहन, क्रीडा स्पर्धांचे आयोजन, शैक्षणिक गुणवत्ता व व्यक्तिमत्व विकास, इमारत व परिसर स्वच्छता,२ शाळा व्यवस्थापनाकडून आयोजित उपक्रम व त्यातील घटकांचा सहभाग याअंतर्गत -आरोग्य,आर्थिक साक्षरता, भौतिक सुविधा, तंबाखू मुक्त शाळा, प्लास्टिक मुक्त शाळा, विविध उपक्रमामध्ये माजी विद्यार्थी पालक संस्था यांचा सहभाग आहे अशा संदर्भात समितीने शाळा पाहणी केली. या समितीचे अध्यक्ष सुनंदा बागडे, सदस्य म्हणून मंगेश चौगुले, मोहन भिसे,मनीषा भोईटे,पी डी कांबळे यांनी या समितीचे सदस्य म्हणून काम पाहिले. सदर शाळेला भेट दिली असता त्यांनी सर्व घटकांचे मूल्यमापन करून शाळेच्या कामकाजाबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले. मुख्यमंत्री माजी शाळा सुंदर शाळा यशस्वीतेसाठी गटविकास अधिकारी चंद्रकांत बोडरे, गटशिक्षणाधिकारी अनिल संकपाळ केंद्रप्रमुख बन्याबा पारसे,तंत्रस्नेही शिक्षक किशोर चांदगुडे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.यावेळी शाळेचे शिक्षक दत्तात्रय मसुगडे,मनोज चव्हाण यांनी सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी यांचे कौतुक केले.

# भंडाऱ्याचा प्रसाद खाल्ल्यानंतर झाली विषबाधा

आधुनिक केसरी न्यूज

**नंदुरबार :** आजकाल सर्वत्र वेगवेगळ्या देवांच्या नावांनी, वेगवेगळ्या कारणांनी भंडाऱ्याचे आयोजन केले जाते. भंडाऱ्यातील प्रसादरुपी जेवणाचा आस्वाद घेण्यासाठी अशा ठिकाणी नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गर्दीही होत असते. या भंडाऱ्यांमध्ये वापरल्या जाणाऱ्या अन्नपदार्थांची कोणतीही तपासणी केली जात नसल्याने काही वेळा भलतेच घडते. नंदुरबार जिल्ह्यातील रनाळा येथे असाच प्रकार घडला. ग्रामीण भागात बाळूमामा यांच्यावर श्रध्दा असणारे बहुसंख्य आहेत. रनाळे येथे बाळूमामा यांच्या नावाने भंडाऱ्याचा कार्यक्रम मंगळवारी रात्री ठेवण्यात आला होता. बाळूमामा यांच्या नावाने ठेवण्यात आलेल्या या भंडाऱ्यासाठी परिसरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. भंडाऱ्यात प्रसादरुपात भगर आमटी आणि दूध असा बेत ठेवण्यात आला होता. या प्रसादाचे सेवन केल्यानंतर काही भाविकांना त्रास सुरु झाला.

# अयोध्येस विशेष रेल्वेने रवाना ४०० रामभक्तांचे हंसराज अहीर यांच्याद्वारे स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** पुण्यभुमी अयोध्या येथे प्रभु श्रीरामचंद्रांच्या दर्शनाकरीता चंद्रपूर येथून रेल्वेने जाणाऱ्या ४०० प्रवाश्यांच्या जत्थ्याचे राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी स्वागत केले व त्यांना शुभेच्छा दिल्या. दि. २० फेब्रुवारी रोजी बल्लारशाह-अयोध्या स्पेशल ट्रेन (नं. ००१५९) ने हे रामभक्त अयोध्येला रवाना होत असल्याने अहीर यांनी रात्री १२.१५ वाजता चंद्रपूर रेल्वेस्टेशनवर पोहचून या सर्वांना सुखद यात्रेकरीता शुभेच्छा देवून स्वागत केले.

याप्रसंगी मनपाचे माजी सभापती रविंद्र गुरनूले चंद्रपूर रेल सुविधा संघर्ष समितीचे तसेच ZRUCC चे सदस्य दामोदर मंत्री, नरेंद्र सोनी, पुनम तिवारी, श्याम सारडा, अनिष दिक्षीत, संजय मंघाणी, किशोर बंदावार, रितेश वर्मा यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

चंद्रपूर रेल्वे स्टेशनच्या अधिकाऱ्यांनीही अयोध्येस जाणाऱ्या या रामभक्तांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. रात्री ०१.१० मिनीटांनी सर्व रामभक्त अयोध्येकरीता रवाना झाले. यावेळी उपस्थित रामभक्त व मान्यवरांनी भारत माता की जय व जय श्रीराम चे नारे देवून रेल्वे स्थानकाचा परिसर निनादून सोडला.



# वातावरणातील बदलामुळे हरभरा पिकामध्ये मोठ्या प्रमाणात घट

आधुनिक केसरी न्यूज

**शंकर सदार**

**रिसोड :** जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे हातातील खरीप पिक गेल्यानंतर सर्व शेतकरी वर्गाची आशा मात्र रबी पिकाकडे होती. मात्र यामध्ये सुद्धा शेतकऱ्यांचा पदरात निराशा पडली आहे. निसर्गाच्या लहरी पणामुळे तूर तसेच हरभरा पिकामध्ये मोठ्या प्रमाणात घट बघायला मिळत असल्याचे शेतकरी वर्गाकडून बोले जात आहे.
हरभरा हे रब्बी पिक असून त्याची पेरणी ऑक्टोबर ते नोव्हेंबर केली जाते. तर काढणी मार्च ते एप्रिल या दरम्यान केली जाते. जिल्ह्यात यंदा मोठ्या प्रमाणात हरभऱ्याची पेरणी करण्यात आली होती. सध्या जिल्ह्यात काही ठिकाणी हरभऱ्याची काढणी सुरू आहे. मात्र वातावरणातील बदलाचा परिणाम हरभऱ्याच्या उत्पादकतेवर होण्याची शक्यता शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. तसेच हरभरा पिकाची घट होईल असाही अंदाज वर्तवला जात आहे. यामुळे जिल्ह्यातील हरभरा उत्पादक शेतकरी सध्या चिंतेत आहेत.
हरभरा पिकावर हवामान बदलाचा मोठा परिणाम दिसून आला आहे. पेरणीवेळी पाणी आणि त्यानंतर धुक्यासह हरभऱ्यावर घाटी अळीचा प्रादुर्भाव झाला. याचा परिणाम हा हरभऱ्याच्या उत्पादनावर होण्याची शक्यता शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.
जिल्ह्यातील काही भागात सध्या हरभरा काढणीस सुरवात झाली आहे. काढणीनंतर हाती एकरी २ ते ३ क्विंटल उत्पादन पडेल अशी शक्यता शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. यामुळे शेतकरी सध्या चिंतेत आहेत. तर आशा परिस्थितीत सरकारने मदत करावी अशी मागणी जिल्ह्यातील हरभरा उत्पादक शेतकऱ्यांनी केली आहे.

हरभरा पिक पेरल्यानंतर काही दिवस हरभरा जोमात होता मात्र सुरुवातील अवकाळी पाऊस पडल्याने चांगल्या दिसणार हरभरा जास्त पाण्यामुळे जळ होती . त्यानंतर सुद्धा थोड्या प्रमाणात पिक होईल असे वाटले पण बदलत्या वातावरणामुळे एकरी दोन तीन क्विंटल असे उत्पादन होत आहे . त्यामुळे हरभरा पिकामधून उत्पादन खर्च सुद्धा निघत नसल्याने शासनाने शेतकऱ्याल मदत करावी .
**मारोती पाटील, शेतकरी**



# अल्पवयीन मुलीला गुंडांची मारहाण

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** नवे पोलीस आयुक्त रुजू झाल्यापासून हत्याकांडाची मालिका आणि गुन्हेगारांमध्ये टोळीयुद्ध रंगली आहेत. अनेक लहान गुन्हेगार वस्तीत वर्चस्व निर्माण करण्यासाठी सरसावले आहे. त्यामुळे शहरातील पोलिसांचा वचक संपल्यागत दिसत आहे. जरीपटका पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका अल्पवयीन मुलीला गुंडांनी दुचाकीवरूनच मारहाण केली व त्यात ती बेशुद्धच झाली. भर वस्तीत हा प्रकार झाल्याने खळबळ उडाली आहे. गट्टू उर्फ हिमांशू नांदगावे, सोनू भालादारे व त्यांच्या एका साथीदाराने हा प्रकार केला आहे. हे गुंड प्रवृत्तीचे आहेत. इंदोरा परिसरात एक गरीब कुटुंब राहते. त्यातील १५ वर्षीय अल्पवयीन मुलगी रविवारी रात्री घराबाहेर उभी होती. वस्तीत कुणाचा तरी वाद सुरू असल्याने नेमका काय प्रकार आहे हे ती पाहत होती. त्यावेळी आरोपी दुचाकीवरून मागून आले व मुलीच्या मानेवर जोरदार प्रहार केला. त्यात ती जागेवरच बेशुद्ध पडली. एका अल्पवयीन मुलालादेखील या गुंडांचा मार बसला. मुलाने त्यांना थांबविण्याचा प्रयत्न केला असता आरोपींनी तिला जीवे मारण्याची धमकी दिली. मुलगी बेशुद्ध पडल्याने नागरिकांनी धाव घेतली. आरडाओरड ऐकून तिचे कुटुंबीय धावत बाहेर आले. शुद्धीवर आल्यावर मुलीने हा घडलेला प्रकार सांगितला.

# तालुक्यात १८ केंद्रांवरून बारावीची परीक्षा

## साडेपाच हजार विद्यार्थ्यांचा सहभाग; कॉपीमुक्त परीक्षेवर प्रशासनाचा भर

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** तालुक्यातील १८ केंद्रांवर कालपासून बारावीच्या विद्यार्थ्यांची शालांत परीक्षा सुरू झाली आहे . पेपर सुरू होण्यापुर्वी विद्यार्थ्यांना अर्धा तास अगोदर केंद्रावर उपस्थित राहणे बंधनकारक असून कॉपीमुक्त परीक्षेचा घेण्यावर प्रशासनाचा भर आहे.
रिसोड तालुक्यात १८ परीक्षा केंद्रांवर बारावीची परीक्षा घेण्यात येणार आहे. या परीक्षा केंद्रांवर एकुण ५ हजार ५०० विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. मंडळाने कॉपीमुक्त परीक्षेसाठी यंदा वेगवेगळ्या पद्धतीचा अवलंब करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे एकच शाळा किंवा कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी परीक्षेवेळी एकामागे एक नसणार आहेत. वेगवेगळ्या परीक्षा केंद्रावर त्यांचे क्रमांक असतील. विद्यार्थ्यांना पेपर सुरू होण्याच्या दहा मिनिटे अगोदर प्रश्नपत्रिका दिली जायची. पण, आता ही पद्धत बंद करून पेपरच्या शेवटी दहा मिनिटांचा वाढीव वेळ दिला जाणार आसल्याची विश्वसनीय माहीती आहे. कॉपीमुक्त परीक्षेसाठी परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरातील सर्व झेरॉक्स सेंटर, संगणक क्लास पेपर होईपर्यंत बंद राहतील. असेही बोर्डाने स्पष्ट केले आहे. भाषा विषया शिवाय इतर विषयांच्या पेपरसाठी विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी वेळ मिळेल, असे वेळापत्रक तयार केले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी परीक्षेबद्दल कोणतीही भीती न बाळगता आत्मविश्वासाने परीक्षा द्यावी, असे आवाहन ही गटशिक्षणाधिकारी बद्रीनारायण कोकाटे यांनी केले आहे.

तालुक्यातील एकुण १८ परीक्षा केंद्रावर बारावीची परीक्षा अगदी शासणाच्या नियमानुसार होणार आहे . कुठल्याही परीक्षा केंद्रावर चुकीचा प्रकार खपवुन घेतल्या जाणार नाही . काही परीक्षा केंद्रावर विशेष लक्ष ठेवले जाणार आहे . विद्यार्थीनी कोणत्याही दडपणाशिवाय धैर्याने परीक्षेला सामोरे जावे .
**बद्रीनारायण कोकाटे गटशिक्षणाधिकारी पं .स . रिसोड**

# वाचक महोत्सवाने रसिक मंत्रमुग्ध

## लोकशिक्षण संस्थेचा नावीन्यपूर्ण उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज




**वरोरा :** लोकशिक्षण संस्था वरोडा संचालित लोकमान्य इंग्रजी विद्यालयाच्या वतीने 'असे वाचक घडलो आम्ही' या उपक्रमाचे आयोजन लोकमान्य प्राथमिक विद्यालयाच्या प्रांगणात नुकतेच करण्यात आले होते
' येणे वाचने तोषावे ' या पहिल्या सत्रात नागपूर येथील इतिहासाचे अभ्यासक प्रवीण योगी, नागपूर आकाशवाणी केंद्राचे माजी संचालक डॉ संजय भक्ते तर हिंगणघाट येथील श्रेयस प्रकाशनाचे डॉ. चंद्रकांत नगराळे, या वाचकांनी त्यांच्या वैयक्तिक ग्रंथ संग्रहाबद्दल विचार व्यक्त करीत आपले अनुभव मांडले. त्यांच्यावर झालेल्या वाचन संस्काराचा आढावा याप्रसंगी मान्यवरांनी घेतला . लोक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा श्रीकांत पाटील यांनी बीज प्रास्ताविक केले तर संचालन डॉ. श्रीनिवास पिलगुलवार यांनी केले. ' वाचू आनंदे ' या दुसऱ्या सत्रात प्रा विजय देशपांडे, यवतमाळ, यांनी योगीराज बाबुल लिखित तमाशा विठाबाईच्या आयुष्याचा या चरित्रात्मक पुस्तकावर भाष्य केले. वैशाली जानवे, यांनी द आलकेमिस्ट या कादंबरीवर तर शंकर दिगदेवतुलवार यांनी एकीगाई या जपानी प्रेरणादायी पुस्तकाचा आढावा घेतला. दीपक नवले यांनी सदानंद देशमुख लिखित ग्रामीण वास्तवाचे विदारक चित्र मांडणाऱ्या बारोमास या कादंबरीवर भाष्य केले. या सत्राचे सूत्रसंचालन डॉ प्रशांत खुळे यांनी केले. 'लेखक वाचकाच्या भेटीला' या तिसऱ्या सत्रात लेखकांच्या जाणिवांचा धागा जोडत प्रसिद्ध नाट्य लेखक प्रमोद भुसारी, नागपूर यांच्या भोवरा या नाट्यकृतीला विदर्भ साहित्य संघाचा पुरस्कार आणि प्रा डॉ प्रमोद नारायणे, वर्धा यांच्या मी पॉझिटिव्ह आलो या स्वानुभव कथात्मक प्रकाराला मिळालेला साहित्य संघाचा पुरस्कार याबद्दल त्यांची प्रकट मुलाखत डॉ. जयश्री शास्त्री यांनी घेतली. यावेळी याप्रसंगी भुसारी यांनी वाचिक अभिनय तर डॉ नारायणे यांनी ' म्हणजे म्हणजे वाघाचे पंजे' या कविता संग्रहातील कवितांचे गायन केले. अखेरच्या सत्रात विविध ठिकाणी होत असलेल्या प्रचलित विविध उपक्रमांचा परिचय मुक्त चर्चेतून रसिकांच्या पुढे मांडण्यात आला. डॉ संजय साबळे यांनी आपले स्वानुभव कथन याप्रसंगी केले. विविध चित्रफीत दाखविण्यात आल्या. या सत्राचे सूत्रसंचालन उमेश लाभे यांनी केले. वाचक श्रोता आणि वाचक वक्ता असे स्वरूप असलेल्या या नाविन्यपूर्ण वाचक महोत्सवाला रसिकांनी भरभरून दाद दिली. पिंपळापुरे प्रकाशनाच्या वतीने ठेवण्यात आलेल्या ग्रंथ विक्रीला वाचकांनी भरीव प्रतिसाद दिला. विदर्भातील वाचकांच्या आणि लेखकांच्या समृद्ध अनुभवाचे दर्शन या महोत्सवा च्या निमित्ताने अनुभवायला मिळाले.

# ॲसेंड स्कूलमध्ये संविधान परीक्षेचा निकाल जाहीर; शिवजयंतीनिमित्त प्रमाणपत्राने सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून निरा-पिंपरे येथील ॲसेंड इंटरनॅशनल स्कूलमध्ये राज्यस्तरीय संविधान गुण गौरव परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.रक्षित सामाजिक संस्था म्हसळे अंतर्गत स्थापित संविधान गुणगौरव समितीच्या वतीने नूरखा पठाण लिखित "आपले संविधान... राज्यपद्धती नव्हे तर जीवनपध्दती" या पुस्तकावर आधारित राज्यस्तरीय गुणगौरव परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते.ही परीक्षा दिनांक २ डिसेंबर रोजी निरा-पिंपरे येथील ॲसेंड इंटरनॅशनल स्कूलमध्ये घेण्यात आली होती.विद्यार्थी, शिक्षकच नव्हे तर शाळेच्या प्रमुखांनी सुद्धा या अनोख्या उपक्रमात सहभागी होत ही संविधान परीक्षा दिली होती.या परीक्षेचा निकाल शिवजयंतीचे औचित्य साधून जाहिर करतेवेळी पेपर तपासणीस दादासो धायगुडे, सामाजिक कार्यकर्ते सचिन मोरे,शाळेचे संस्थापक अध्यक्ष सोमनाथ खोमणे,सचिव नीता खोमणे, मुख्याध्यापिका सुषमा भुंजे,संविधान गुणगौरव समितीचे सदस्य सुशिल गायकवाड आदींसह शिक्षकवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते.
कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.तदनंतर शाळेचे शिक्षक नितीन दगडे यांच्या कडून भारतीय संविधान उद्देशिकेचे वाचन करण्यात आले.तसेच निकाल जाहीर करण्यात आला.मोठ्या गटातून रूपाली शितोळे, नीता खोमणे आणि नितीन दगडे आदींनी अनुक्रमे प्रथम,व्दितीय आणि तृतीय क्रमांक मिळविला. तसेच लहान गटातून उत्कर्षा पवार,आर्या साळुंखे आणि श्रेयश गुरमुडे आदी विद्यार्थ्यांनी अनुक्रमे प्रथम,व्दितीय आणि तृतीय क्रमांक पटकावला. यावेळी मेडल्स,प्रमाणपत्र आणि यशस्वी जीवनाचा मूलमंत्र हे पुस्तक तसेच शालेय वस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.मोठया गटातून उत्तेजनार्थ म्हणून मंजुश्री काटकर यांचा सन्मान करताना प्रमाणपत्र आणि शोध अस्तित्वाचा हे पुस्तक देण्यात आले.तसेच लहान गटातून अथर्व साबळे आणि प्रांजल जाधव या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र आणि गरज सायकलची हे पुस्तक देण्यात आले.मोठ्या गटातून शाळेचे अध्यक्ष सोमनाथ खोमणे,शिक्षकवृंद



दीपिका निगडे, माधुरी ठोंबरे तसेच लहान गटातून कबीर सोळंकी,श्रेया धुमाळ,दुर्वा ननावरे,स्वप्नाली क्षीरसागर, स्वरांत पिसाळ, दिप्ती आगम,ईश्वरी फरांदे, सार्थक धायगुडे,अभय भोसले, समिधा निगडे,तन्मय गरदडे आदी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राने सन्मानित करण्यात आले.यावेळी पेपर तपासणीस दादासो धायगुडे,सामाजिक कार्यकर्ते सचिन मोरे,शाळेचे संस्थापक अध्यक्ष सोमनाथ खोमणे, शिक्षिका रुपाली शितोळे आदींनी मनोगते व्यक्त केली.केंद्र प्रमुख म्हणून जबाबदारी पार पाडल्याबद्दल अल्पना फरांदे यांचा प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करत असताना सार्थक फरांदे,प्रिन्स साळुंखे,शौर्य वाघमारे,अंकिता थोपटे,आर्या साळुंखे,श्रेया धुमाळ,स्वप्नाली क्षीरसागर,दिप्ती आगम,दुर्वा ननावरे,स्नेहल बरदडे,ईश्वरी फरांदे,श्रेयश गुरमुडे आदी विद्यार्थ्यांनी पोवाड्याचे सादरीकरण केले.प्रितम धुमाळ,श्री निंगडे,शिवराज निगडे आदी विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांची वेशभूषा केली होती. छत्रपती शिवाजी महाराज यांचा जयंती उत्सव आणि संविधान गुणगौरव परीक्षेचे प्रमाणपत्र वाटप हा कार्यक्रम संपन्न होत असताना सरते शेवटी छत्रपती शिवाजी महाराजांचा विजय असो,जय भवानी जय शिवाजी,हर हर महादेव तसेच भारतीय संविधानाचा विजय असो, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो आदीं घोषणा देत जयघोष ही करण्यात आला.

## उद्धव ठाकरेंच्या स्वागतासाठी जळगाव नगरी सज्ज

आधुनिक केसरी न्यूज

**सागर झनके**

**जळगाव जा :** शिवसेना पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धव



ठाकरे यांची 22 फेब्रुवारी रोजी जळगाव शहरातील श्रीपाद कृष्ण कोल्हटकर महाविद्यालयाच्या प्रांगणात जाहीर सभा होणार आहे. लोकसभेच्या निवडणुकांचे बिगुल वाजले असून, त्या पार्श्वभूमीवर जळगाव जामोद येथे होणाऱ्या सभेला महत्त्व प्राप्त झाले आहे. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे प्रथमच जळगाव नगरीत येत असल्यामुळे जळगाव जामोद तालुक्यातील शिवसैनिकांसह सर्वसामान्य लोकांचा आनंद शिगेला पोहचला आहे. 1966 मध्ये शिवसेनेची स्थापना झाली. मराठी भाषा, मराठी माणूस आणि मराठी माणसांच्या प्रश्नांवर आदरणीय बाळासाहेब ठाकरे यांनी सतत आवाज उठविला. शिवसेनेचा हा झंझावात अखंडपणे आजतागाय असाच चालू आहे. जळगाव जामोद तालुक्यामध्ये खऱ्या अर्थाने शिवसेनेची मुहूर्तमेढ रोवली ती गजानन भाऊ वाघ यांनी. १९८० च्या दशकात गजानन भाऊ यांना बाळासाहेब ठाकरे यांनी तालुका शिवसेना प्रमुखाची जबाबदारी दिली. तालुक्यात शिवसेनेचे नावही नव्हते आणि शिवसेनेला फारसं कोणी ओळखते नव्हते अशा परिस्थितीत गजानन भाऊ वाघ यांच्यावर पक्षाने तालुका प्रमुखाची जबाबदारी सोपवली. या माणसाने ऊन, वारा, पाऊस पाण्याची परवा न करता कधी पायी तर कधी सायकलने गावोगावी जाऊन पक्षाची बांधणी केली. परिस्थिती हलाखीची असतानाही, जिद्द, आत्मविश्वास,चीकाटी मनात ठेवून या माणसाने शिवसेनेची पाळीमुळे तालुक्यात खोलवर रोवली. लोकांना पक्षाचे ध्येय धोरणे समजून सांगितले एवढेच नाही तर ज्यावेळेस मुंबईला मिटींग असायची त्यावेळेस हा माणूस खिशात पैसे असो नसो एकटा जायचा. पक्षाने दिलेला संदेश कार्यकर्त्यांप्रयंत पोहचवायचा. पक्षाशी एकनिष्ठ आणि प्रामाणिक राहून या माणसाने संपूर्ण तालुक्यामध्ये शिवसेना वाढवली. गजानन भाऊंनी लावलेल्या शिवसेना या छोट्या रोपट्याचा आज मोठा विस्तीर्ण वटवृक्ष झाला आहे. त्याच्या सावलीत अनेक जण आश्रय घेतांना आज आपल्याला दिसतात. याचे सर्व श्रेय गजानन भाऊ वाघ यांना जाते. उद्धव ठाकरेंची जळगाव शहरात पहिल्यांदाच सभा होत असून या सभेला शिवसेनेचे खा. संजय राऊत, माजी केंद्रीय मंत्री तथा पच्शिम विदर्भ संपर्क प्रमुख खा. अरविंद सामंत उपस्थित राहणार आहेत. गजानन भाऊ वाघ व त्यांच्या सहकाऱ्यांनी आपल्या नेत्याच्या स्वागतासाठी मोठ्या ताकतीने गावोगावी प्रचार प्रसार करणे चालू केले आहे.या ऐतिहासिक सभेला मोठ्या प्रमाणावर सर्व समाजातील बंधु भगिनीनी आणि तरूणांनी यावे असे आवाहन शिवसेना तालुकाप्रमुख गजानन भाऊ वाघ,दत्ता पाटील जिल्हा सह संपर्कप्रमुख,उल्हास माहोदे तालुका उपप्रमुख, भिमराव पाटील विधानसभा संघटक यांनी केले.

## नदीजोड प्रकल्पात वाशिम जिल्हा समाविष्ट होणे गरजेचे : विष्णुपंत भुतेकर

आधुनिक केसरी न्यूज

**वाशीम :** विदर्भातील वैनगंगा- नळगंगा नदीजोड प्रकल्प हा राज्यस्तरीय प्रकल्प असुन भंडारा जिल्ह्यातील महत्त्वाकांशी गोसीखुर्द प्रकल्पात पावसाळ्यात उपलब्ध होणारे अतिरिक्त पाणी वैनगंगा उपखोर्यातील पाणी बुलढाणा जिल्ह्यातील नळगंगा प्रकल्पा पर्यंत नदीजोड कालव्यातून वळविण्यासाठी हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. 88, 575 (आठयांशी हजार, पाचसे पंचाहत्तर) कोटी रूपये खर्चाचा राज्यातील पाणी प्रश्नावर आजपर्यंतच्या इतिहासातील सर्वात जास्त खर्च होणारा प्रकल्प आहे. तीन लाख एकाहत्तर हजार दोनसे सत्यातर हेक्टर क्षेत्र सींचनाखाली येणार आहे. यामधे नागपूर,



वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाण्याचा समावेश करण्यात आला आसुन हया जिल्ह्यातील 15 तालुक्यातील शेतजमीनीला सिंचन, पीण्याचे पाणी, उद्योगाकरीता पाणी उपलब्ध होणार आहे. पंरतु आवश्यक आसणार्या आणि आकांशीत, मागास आसणार्या वाशिम जिल्ह्याला हया प्रकल्पातून वगळण्यात आले आहे. वाशिम जिल्ह्यातील सिंचनाचा बॅकलॉग मोठा आहे. वाशिम जिल्ह्यात प्रत्यक्षात केवळ 11% क्षेत्र सिंचन खाली येते. राज्याच्या पाणी कोटयात वाशिम जिल्ह्यासाठी आरक्षीत पाणी साठा उपलब्ध नाही. आशा परिस्थितीत वाशिम जिल्हा समाविष्ट आसणे गरजेचे होते. पंरतु शब्दीक फसवणूक करून सरकारने 6 फेब्रुवारी 2024 ला काढलेल्या आध्यादेशातुन वाशिम जिल्हा गायब केला. 'अभी नही तो कभी नही ' जिल्ह्यातील जनतेने , शेतकऱ्यांनी, सर्व पक्षीय नेत्यांनी या प्रश्नाकडे दुर्लक्ष केल्यास भविष्यात जिल्ह्यातील शेतकरी व जनता पाण्यावाचून तडफडुन मरेल याची जाणीव होणे गरजेचे आहे. वाशिम जिल्हा नदीजोड प्रकल्पात समाविष्ट होई पर्यंत भूमिपुत्र चा लढा सुरूच राहील. या लढ्याला सर्व स्तरातून, सर्वसमावेशक पाठबळ मिळावे हीच रास्त आपेक्षा.

## ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी पुण्यात साधला युवा लेखकांशी संवाद

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** महाराष्ट्रातील विविध भागांतून युवा लेखकांना भेटण्याचे नियोजन करून मा. शरद पवार साहेबांनी पुण्यात शिवजयंती दिवशी मार्केट यार्डातील निर्सग कार्यालयात युवा लेखकांशी साधला संवाद. पु. ल. देशपांडे, जब्बार पटेल ते ना. धो. महानोरांपर्यंत साहित्य क्षेत्राशी संपर्क असलेल्या या नेत्याने आजच्या पिढीतील युवा लेखकांशी तब्बल तीन तास संवाद साधून लेखकांची सद्यस्थिती, समस्या, अडचणी, अडथळे, अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा प्रश्न, ट्रोलींग, लेखनावर होणारी टीका तसेच लेखक व पत्रकार यांची होणारी घुसमट या विषयी जाणून घेतले. लेखकांना निर्भयपणे लिहिता- मांडता येईल यासाठी काय करता येईल यावर त्यांनी चर्चा केली.




महाराष्ट्रातील राजकीय वातावरण ढवळून निघत असताना अशा वेळी एवढी मोठी आव्हानं, प्रश्न समोर असताना साहेबांनी एवढा वेळ लेखकांशी संवाद साधला ही गोष्ट त्यांच्याकडून शिकण्यासारखी आहे अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली. सर्व बाबी ऐकून त्यावर तोडगा काढण्याचा प्रयत्न करू असे आश्वासन त्यांनी दिले. प्रसंगी मा. खासदार सुप्रिया सुळे याही उपस्थित होत्या.

## २५ फेब्रुवारीला 'अक्षरवेल'चे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** 'अक्षरक्रांती' फाऊंडेशनच्यावतीने निर्मित व ज्ञानपथ पब्लिकेशनद्वारा प्रकाशित 'अक्षरवेल' ह्या प्रातिनिधिक काव्यसंग्रहाचे प्रकाशन व राज्यस्तरीय कवीसंमेलन २५ फेब्रुवारीला सकाळी ११.३० वा. टिळक पत्रकार भवन, नागपूर येथे संपन्न होत आहे.

पहिल्या सत्रात 'अक्षरवेल'च्या प्रकाशनाला कविवर्य मा. बबन सराडकर हे अध्यक्षस्थानी असतील तर प्रमुख उपस्थितीत ९७ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष व कादंबरीकार डॉ. रवींद्र शोभणे हे राहतील. ज्येष्ठ साहित्यिका डॉ. शोभा रोकडे ह्या संग्रहावर भाष्य करतील. याप्रसंगी 'अक्षरवेल'चे संपादक शंकर घोरसे व कार्यकारी संपादक प्रभाकर तांडेकर 'प्रदत्त' प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत. प्रथम सत्राच्या सुरुवातीला डॉ. निशा सोनेकर, विलेपार्ले मुंबई ह्या गणेशवंदना (कत्थक नृत्य) सादर करणार आहेत. डॉ. पद्मिनी घोसेकर निवेदन करतील तर 'ज्ञानपथ'चे सचिन सुकलकर हे आभार मानतील.

दुस-या सत्रात राज्यस्तरीय कवीसंमेलनाचे अध्यक्षपद सुप्रसिद्ध कवी मा. गणेश भाकरे हे भूषवतील. अतिथी म्हणून समीक्षक व कवी डॉ. वासुदेव डहाके, (नागपूर) तर प्रमुख उपस्थितीत कवी मा. केशव कुकडे 'मुक्तविहारी', (परळी वैजनाथ) हे असतील. ह्या कविसंमेलनात राज्यातील एकूण २५ कवी/कवयित्री सहभागी होणार आहेत. कवीसंमेलनाचे सूत्रसंचालन कवयित्री मंजूषा कऊटकर करतील तर आभार कवयित्री विद्या निनावे मानतील. कार्यक्रमाची सांगता रजनी पारधी यांच्या पसायदानाने होणार आहे. ह्या कार्यक्रमाला रसिक मंडळींनी बहुसंख्येने उपस्थित राहावे; असे आवाहन अक्षरक्रांती फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शंकर घोरसे व ज्ञानपथ प्रकाशनचे संचालक सचिन सुकलकर यांनी केले आहे.



## दे.राजा हायस्कूलमध्ये शिवजयंती

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** स्थानिक देऊळगाव राजा हायस्कूल कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. .याप्रसंगी प्रथम मान्यवरांनी प्रतिमेचे पूजन केले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य आर. बी. कोल्हे सर प्रमुख उपस्थितीमध्ये उपप्राचार्य व्ही. डी. देशपांडे, डी. व्ही. जाधव, पि. के. राठोड सुनील तिवारी आदींची उपस्थिती होती. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी वेशभूषेसह गीत, पोवाडे व भाषण सादर करीत सर्वांचे मन जिंकली.

कार्यक्रमाचे संचालन कु. मगर व कु. गायकवाड तर आभार प्रदर्शन कु झोरे हिने केले. उपस्थित सर्वांनी शिवरायांच्या प्रतिमेस अभिवादन केले.

## दुचाकीस्वार ऊस जुगाडावर धडकून ठार

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** तालुक्यातील संवत्सर ग्रामपंचायत हद्दीत वैजापूर रस्त्यावर नुकतेच पहाटेच्या २.१५ वाजेच्या सुमारास संजीवनी सहकारी साखर कारखाण्याचे नादुरुस्त होऊन रस्त्यात पडलेले ऊस जुगाड अंधारात न दिसल्याने मागील बाजूने कासली येथील तरुण अक्षय संपत साबळे हा २२ वर्षीय तरुण ठार झाला असून दुसरा तरुण अजित बाबासाहेब भंडारी हा गंभीर जखमी झाला असल्याची धक्कादायक माहिती उपलब्ध झाली आहे. या प्रकरणी कोपरगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. त्यामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

सदरचे सविस्तर वृत्त असे की, वर्तमानात कोपरगाव तालुक्यातील सहकारी साखर कारखान्यांचा हंगाम अंतिम टप्प्यात आला असून त्यासाठी ऊस वाहतुकीसाठी ऊस जुगाडाने वाहतूक मोठ्या प्रमाणात सुरु असते. सदर जुगाडांना अनधिकृत मागील बाजूने रात्रीच्या सुमारास अपघात प्रतिबंधक परावर्ती रेडियम लावण्याची सक्ती केलेली आहे. मात्र बऱ्याच वेळा हे अनधिकृत वाहतूक करणारे जुगाड चालक त्याचे पालन करताना दिसत नाही. परिणामी रात्रीच्या सुमारास पुढील तीव्र प्रकाश झोताचे वाहन आल्यास पुढील बाजूस नादुरुस्त असलेले जुगाड दिसत नाही. परिणामी वाहन चालक हा त्यावर धडकून मोठा अपघात होताना दिसत आहे. या अशा घटना वांरवार होताना दिसत आहे. मात्र त्याला सहकारी साखर कारखाने मात्र दखल घेताना दिसत नाही. परिणामी अनेक नागरिकांना आपले प्राण हकनाक गमवावे लागत आहे. अशीच घटना नुकतीच उघड झाली असून यातील कोपरगाव तालुक्यातील कासली ग्रामपंचायत हद्दीत रहिवासी असलेला मयत तरुण अक्षय संपत साबळे हा अशाच जुगाडावर मागील बाजूने धडकून ठार झाला आहे. तर त्याचा सहकारी अजित बाबासाहेब भंडारी (वय-२३) हा तरुण गंभीर जखमी झाला आहे. हि घटना दि.१० जानेवारी रोजी पहाटे २.१५ वाजता घडली होती.

या प्रकरणी कोपरगाव शहर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विश्वास पावरा यांनी भेट दिली आहे. दरम्यान आधी या प्रकरणी अकस्मात गुन्हा क्रं. ५/२०२४ सी.आर. पी.सी.कलम १७४ प्रमाणे दाखल करण्यात आला होता. त्याचा तपास केला असता हा अपघाताचा गुन्हा दाखल केला आहे. त्याबाबत नागरिकांनी शहर पोलीस ठाण्याच्या पोलिस अधिकाऱ्यांचे कौतुक केले आहे. या प्रकरणी फिर्यादी संपत शिवराम साबळे यांनी कोपरगाव शहर पोलीस ठाण्यात शंकरराव कोल्हे (संजीवनी) सहकारी साखर कारखाण्याचे जुगाड क्रं.७० चा वापरकर्ता ट्रॅक्टर वरील चालक (नावगाव माहिती नाही) या आरोपी विरुद्ध गुन्हा क्रं.७५/२०२४ भा.द.वि.कलम ३०४(अ), २७९,३३७, ३३८,४२७, २८३सह मोटार वाहन कायदा कलम-१०४/१७७,१३४, (अ) (ब)/१७७ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.



## वाळवण्याच्या कालभैरवनाथ चरणी सतरा तोळ्यांचा सोनेरी मुकुट दान

आधुनिक केसरी न्यूज

**पारनेर :** तालुक्यातील वाळवणे येथील स्वयंभू श्री. काळ भैरवनाथा चरणी विकास खेडकर (रवळगाव ता. कर्जत ) यांनी १७० ग्राम वजनाचा सोनेरी मुकुट नुकताच अर्पण केल्याची माहिती भैरवनाथ देवस्थानचे अध्यक्ष नितीन पठारे यांनी दिली. भैरवनाथांच्या शिखर जीर्णोद्धाराचे काम अंतिम टप्प्यात आले असून या साठी अनेक भाविकांनी सढळ हाताने मदत केली आहे. या वेळी अहमदनगर येथून पत्रकार बाजीराव खांदवे, डॉ. महेश कोकाटे, सुरेश खेडकर, सौ. सोनाली खेडकर, राहुरीचे पाराजी कातोरे, रवळगाव येथून खेडकर परिवार तसेच ट्रस्ट चे सर्व विश्वस्त व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी खेडकर परिवाराचा व सन्माननीय मंडळींचा भैरवनाथ देवस्थान च्या वतीने सन्मान करण्यात आला.

# तहसीलदार सोनाली जोंधळे यांची धडाकेबाज कारवाई !

## लोणार तालुक्याच्या हद्दीमध्ये अवैध रेती वाहन पकडत केला गुन्हा दाखल !

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** मराठवाड्यातील जालना जिल्ह्यातील मंठा तालुक्याच्या तहसीलदार सोनाली जोंधळे यांनी विदर्भातील लोणार तालुक्याच्या हद्दीमध्ये अवैद्य रेती वाहतूक करणारे वाहन पकडून कारवाई करत गुन्हे दाखल केल्याने रेती माफियांच्या चांगल्याच मुसक्या आवळल्याचा विषय चर्चेचा झाला आहे.

मराठवाड्यातून दररोज अंदाजे ५० वाहने हे दिवसरात्र अवैद्य रेती वाहतूक करीत सीमा ओलांडून विदर्भातील लोणार तालुक्यात घुसतात. अवैद्य रेती उपसा आणि वाहतुकीमुळे शासनाचा करोडो रुपयांचा महसूल बुडत असल्याने याला पायबंद घालण्यासाठी मंठा तहसीलच्या तहसीलदार सोनाली जोंधळे ह्या एक्शन मोड आल्या आहेत. त्यांनी नियोजनबद्ध रेती माफियांवर कारवाईचा धडाका लावला असल्याचे दिसून येत आहे.

१९ फेब्रुवारी २०२४ रोजी दुपारी ४ वाजेच्या दरम्यान मंठा तहसीलदार सोनाली जोंधळे, तलाठी नितीन चिंचोले, पुरवठा विभागातील कर्मचारी सचिन कळणे हे अवैद्य रेती वाहतूक रोखण्यासाठी खाजगी वाहनाने तळणी हद्दीमध्ये पेट्रोलिंग करीत होते. दरम्यान त्यांना विदर्भातील लोणार कडे विना वाहन क्रमांक असलेले पिवळ्या रंगाचे टिप्पर भरधाव वेगात जात असल्याचे दिसून आले. सदर वाहन थांबविण्यासाठी त्यांनी इशारा केला. मात्र ते वाहन लोणारच्या दिशेने सुसाट वेगाने पळून गेले. सदरील वाहनाचा पाठलाग केला असता ते वाहन लोणार तहसिल हद्दीतील हॉटेल तुळजाई समोर पकडले. त्या विना वाहन क्रमांक असलेल्या पिवळ्या रंगाच्या वाहनावरील चालक संतोष



देविदास चंदनपाट याला रेती वाहतुकी बाबत विचारणा केली असता. त्याच्याकडे रेती वाहतुकी बाबत कुठलाही परवाना आढळून आला नाही. दरम्यान त्याचवेळी तळणी येथील अर्चना बालासाहेब राऊत यांनी सदर महसूल पथकास सरकारी कामात अटकाव केला.

या संदर्भात मंठा तहसीलदार सोनाली जोंधळे यांनी लोणार पोलिस स्टेशनला कळवून सदर वाहन लोणार पोलिस स्टेशनच्या ताब्यात देत फिर्याद दिली. सदर फिर्यादीवरून लोणार पोलिस स्टेशनला अपराध क्रमांक ६१ / २४ नुसार कलम ३७९ /१८६ भां.द.वी. सहकलम ३, ४, गौणखनिज अधिनियम १९५२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास लोणार पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक निमिष मेहेत्रे यांच्या मार्गदर्शनखाली पोहेकॉ गजानन सानप, पोकॉ तेजराव भोकरे करीत आहेत. मंठा तहसीलदार सोनाली जोंधळे यांच्या धडाकेबाज कारवाई चे सर्वत्र कौतुक होत असून एखाद्या अधिकाऱ्याच्या मनात आले तर कार्यक्षेत्राच्या बाहेर सुद्धा जाऊन अवैद्य रेती वाहनावर कारवाई करता येऊ शकते. हे या कारवाई वरून सिद्ध होत आहे. सदर धडक कारवाई मुळे अवैद्य रेती वाहतूक करणाऱ्या रेती माफियांचे धाबे दणाणले आहेत.

मंठा तहसीलदार यांनी लोणार हद्दीत येऊन रेती वाहनावर कारवाई केल्याने लोणार तालुक्यातील स्थानिक प्रशासनाच्या कार्यशैलीवर प्रश्नचिन्ह उभे राहत आहे . शहरातून दिवस रात्र रेती वाहने भरधाव वेगाने जात असतांना कोणतीही कारवाई होत नाही . मराठवाड्यातील मंठा तालुक्यातील तहसीलदार सोनाली जोंधळे ह्या महिला अधिकारी विदर्भातील लोणार तालुक्यात येऊन कारवाई करत लोणार पोलिस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल करतात . एवढी मोठी कारवाई झाल्यानंतरही त्याच रात्री आणि दुसऱ्या दिवशीहि राजरोसपणे दिवस रात्र रेतीचे वाहने लोणार शहरातून भरधाव जातात . यावरून रेती माफियांवर स्थानिक प्रशासनाचा एकतर धाक राहिला नसल्याचे दिसून येते किंवा रेती माफियांच्या म्हणण्यानुसार स्थानिक प्रशासन आमच्या वर कारवाईच करू शकत नाही, हे असू शकते . सदरील कारवाई वरून स्थानिक प्रशासनाची भूमिका तटस्थ का हा विषय सर्वत्र चर्चिला जात आहे .



# समर्थ कृषी महाविद्यालयात शिवजयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** समर्थ कृषी महाविद्यालय येथे शिवजन्मोत्सव मान्यवरांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे संचालक मनोज कायंदे, प्राचार्य डॉ. नितीन मेहेत्रे, प्रभारी जिमखाना प्रा. मोहजीतसिंह राजपूत,प्रा विलास सातपुते, प्रा किरण ठाकरे यांनी शिवप्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलन करत शिवम नवले यांच्या शिवगर्जनेने शिवजन्मोत्सवाला आनंदी वातावरणात सुरुवात केली. या जन्मोत्सवात छत्रपती शिवाजी महाराज यांचा इतिहास जागविण्यासाठी विद्यार्थ्यांनी पोवाडे सादर केले तर काही विद्यार्थिनींनी छत्रपती शिवरायांच्या चरित्रावर आधारित प्रसंगाचे वर्णन आपल्या मनोगतातून व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ नितीन मेहेत्रे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी सांगत असताना महाराजांचे बालपण कशा कठीण प्रसंगातुन उभे राहिले याचे सविस्तर विश्लेषण केले. या शिवजन्मोत्सवास प्रा. सचिन सोळंकी , वसतीगृह अधिक्षक प्रा. देवानंद नागरे, प्रा अश्विनी जाधव, प्रा विजय पवार, प्रा श्वेता धांडे, प्रा मंगेश धांडे, प्रा चारुदत्त जायभाये, प्रा पवन सहाणे, प्रा ग्रीष्मा देहाने,समर्थ शिवजयंती ग्रुपचे सदस्य, कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

# राज्यात कायदा सुव्यवस्थेचा बोजवारा

आधुनिक केसरी न्यूज

**किशोर पाटणी**

**शिर्डी :** राज्यात कायदा सुव्यवस्थेचा बोजवारा उडाला आहे . सत्ताधारी पक्षाचा आमदार पोलिस ठाण्यात गोळीबार करण्याची हिम्मत दाखवतो तर कोकणातील राणेंचा पुत्र पोलीसांची अब्रू वेशीवर टांगत आहे . गृहविभाग व पोलिस खात्याची प्रतिमा धुळीस मिळाली असल्याने नैतिकतेच्या मुद्द्यांवर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी दिला.

शिर्डीत आयोजित पत्रकार परिषदेत अंधारे बोलत होत्या. यावेळी माजी खा. भाउसाहेब वाकचौरे, सौ. सपना मोरे, नाना बावके, अमोल गायके, सुनील परदेशी, सुहास वहाडणे, संजय शिंदे, स्वाती परदेशी, सचिन चौगुले, भागवत लांडगे यांच्यासह महिला आघाडी शिवसेना ठाकरे गटाचे कार्यकर्ते आणी महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.

यावेळी बोलताना सुषमा अंधारे म्हणाल्या की छत्रपतींचे नाव घेवून राज्य कारभार सांभाळणाऱ्या राज्य सरकारने छत्रपतींच्या विचारांना पायदळी तुडवले आहे. राज्यसभेची उमेदवारी पुन्हा मिळावी यासाठी राणे पिता - पुत्रांनी सर्वच मर्यादा ओलांडल्या आहेत. नितेश राणे फडणवीसांची भाटगीरी करण्यासाठी वाट्टेल तसे बरळत आहेत. पोलीसांची लक्तरे वेशीवर टांगणारी विधाने राणेंचे पुत्र दररोज करत आहेत. राडा संस्कृती शिवसेनेसाठी नवी नाही. यापुढे चिथावनीखोर भाषा राणे -पिता पुत्रांनी थांबवली नाही तर शिवसेना राणेंना राज्यात फिरकू देणार नाही असा इशारा त्यांनी दिला. राज्य सरकारला मराठा आरक्षण देण्याचा अधिकारच नाही. मराठ्यांना आरक्षण द्यायची इच्छाशक्ती असेल तर केंद्रसरकारने क़ायदा करून टिकणारे आरक्षण दिले पाहीजे. राज्य सरकारने दिलेले आरक्षण मराठा समाजाची फसवणुक करणारे आहे.

नगर जिल्ह्यातील, रखडलेला नगर मनमाड महामार्ग, साईसंस्थान कंत्राटी कामगारांचा प्रश्न, साईसंस्थानची धुळखात पडलेली आरोग्य यंत्रणा आदी प्रश्न उध्दव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेच्या अडेंठ्यावर असुन या प्रश्नांवर शिवसेना भविष्यात आंदोलन करून या प्रश्नांना वाचा फोडणार आहे. कांद्यावरील निर्यात बंदी जरी केंद्राने उठवली तरी कांद्याला भाव नाही. नगर जिल्ह्यात ताबा संस्कृती मोठ्या संखेने वाढत चालली असल्याचे त्यांनी सांगितले यावेळी पुंडलिक बावके, विश्वजीत बागुल, दिनेश शिंदे, मयूर शेरवेकर, ऋषिकेश मते, कैलास शिंदे व आदी शिवसैनिक उपस्थित होते.



# राजलक्ष्मी इंटरनॅशनल स्कूलमध्ये शिवजयंती

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** राजलक्ष्मी इंटरनॅशनल स्कूल मध्ये विविध कार्यक्रमांनी छत्रपती शिवरायांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

शिवजयंतीच्या निमित्ताने राजलक्ष्मी इंटरनॅशनल स्कूल मधील बालगोपालामध्ये विशेष उत्साह दिसत होता शिवरायांचा पेहराव करून बाल गोपालांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते.

छत्रपती श्री शिवाजी महाराज यांचे प्रतिमेचे विधिवत पूजन करून शिवजयंतीला सुरुवात झाली यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या भाषण कौशल्यातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकला शिवरायांनी



पुन्हा एकदा या महाराष्ट्राच्या मातीत जन्म घ्यावा अशी इच्छा आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांनी व्यक्त केली विद्यार्थिनी मा जिजाऊ ची वेशभूषा केली होती. राजलक्ष्मी इंटरनॅशनल स्कूलच्या अध्यक्षा मीनलताई शेळके यांच्या अध्यक्षतेखाली आणि सेक्रेटरी डॉक्टर रामप्रसाद शेळके यांच्या उपस्थितीत सीईओ सुजित गुप्ता यांच्या मार्गदर्शनात पार पडला. सूत्रसंचालन गोजरे सर आणि सुनीता टेकाळे यांनी केले आणि आभार प्रदर्शन मुकुल सर यांनी केले.




गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in


# जबरी चोरी प्रकरणातील ६ आरोपी जेरबंद

## बुलढाणा व जालना पोलिसांची संयुक्त कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** जालना येथील स्टील कंपनीची खाजगी वाहन अडवून तब्ब्ल २७ लाख रुपये रोख जबरीने पळवून नेल्याची घटना देऊळगाव राजा चिखली महामार्गावर अंढेरा ते धोत्रा नंदई दरम्यान १४ फेब्रुवारी रोजी घडली होती. सदर घटनेतील सहा आरोपी पोलिसांनी जेरबंद केले असून त्यांच्याकडून रोख सुमारे ६ लाख रुपये जप्त करण्यात आले आहे.

जालना येथील राजुरी स्टील कंपनीच्या खाजगी वाहनातून कंपनीचे २७ लाख रुपये घेऊन जालना कडे जात असताना अज्ञात चोरट्यांनी वाहन अडवून जबरीने रोख रक्कम पळविल्याची घटना घडली होती. सदर प्रकरणात जिल्हा पोलीस अधीक्षक कडासने व उपविभागीय पोलीस अधिकारी मनीषा कदम यांच्या मार्गदर्शनात जालना व बुलढाणा पोलीसांनी तपासाची चक्रे फिरविली. सदरच्या जबरी चोरी मधील सहा आरोपींना जेरबंद करण्यास जालना व बुलढाणा पोलिसांना यश आले असून त्यांच्याकडून सुमारे सहा लाख रुपयांची रोख रक्कमही हस्तगत करण्यात आली आहे.जबरी चोरीतील आरोपी जालना व बुलढाणा पोलिसांच्या संयुक्त कारवाईत तागात घेण्यात आले असून इतर आरोपीं व चोरीतील उर्वरित रक्कम संदर्भात आरोपींना बुलढाणा पोलिस ताब्यात घेणार असल्याची माहिती एसडीपीओ मनीषा कदम यांनी दिली आहे.

# बसचालकांच्या मनमानीचा वयोवृद्ध प्रवाशांना फटका

आधुनिक केसरी न्यूज

**नेमीनाथ जैन**

**बोरी :** एकनाथ शिंदे सरकारने वयोवृद्धांना एसटी प्रवासात मोफत सवलत चालू केली मात्र काही एसटीच्या चालक वाहक यांच्या मनमानीमुळे वयोवृद्धांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे . 28 जानेवारी रोजी अशीच एक घटना बोरी बसथांब्यावर घडली.

सकाळी पावणे अकराच्या दरम्यान रिसोड ते पंढरपूर ही बस बोरी येथे येते. या बसने पंढरपूर ला जाण्यासाठी सकाळी १० वाजल्यापासून पाच सहा जेष्ठ नागरिक बसची वाट पाहत थांबले होते. सदरील बस बोरी थांब्यावर आली व तिथे न थांबता पूढे काही अंतरावर जाऊन थांबली.

पंढरपूर ला जाण्यासाठी पुन्हा दुसरी बस बोरी हून नसल्याने पंढरपूर ला जाणारे काही प्रवाशी घाईघाईने बस पकडण्यासाठी पळत असताना त्या प्रवाशांपैकी दोन वृद्ध रस्त्यावर पडले. मात्र प्रवाशांचे काही सोयरसुतक नसलेल्या या गाडीतील चालक वाहकाने आपली बस परभणी च्या दिशेने पुढे नेली. या बसमध्ये केवळ चार प्रवासी उभे होते. महिलांना पन्नास टक्के सवलत व जेष्ठ नागरिकांना मोफत प्रवास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केल्यानंतर प्रवास्यांविना रिकाम्या धावणाऱ्या बसेस खचाखच भरून धावत आहेत. एसटी महामंडळाचे उत्पन्न ही या योजनेमुळे वाढले आहे. बरेच वाहकही जास्तीत जास्त प्रवासी बसवत आहेत. रिसोड आगाराची एम. एच. ४०- ५७१८ या बसमध्ये मात्र केवळ चार प्रवासी उभे होते. आणखी किमान १०-१५ प्रवासी या बसमध्ये बसले असते. परंतू या बसच्या वाहक व चालकाने आपली बस बोरी बसथांब्यावर थांबवली नाही. त्यामुळे पंढरपूरला जाणाऱ्या त्या ज्येष्ठ नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागला. बोरी बस थांब्याच्या पुढे ग्रामीण रुग्णालय हा एक विनंती थांबा आहे या ठिकाणी मात्र ही थांबली व तिथून चार-पाच प्रवासी बस मध्ये चालकाने घेतले हीच बस जर बोरी बस




थांब्यावर थांबवली असती तर पंढरपूरला जाणाऱ्या त्या वयोवृद्धांचा हिरमोड झाला नसता. याबाबत बसच्या वाहकांना जाब विचारला असता, बस लॉक असल्याने त्या ठिकाणी थांबवली नाही असे उत्तर त्या वाहकाने दिले. तुम्ही गाडी न थांबवल्याने बसचा पाठलाग करणारे दोन वयोवृद्ध रस्त्यावर पडले व

> रिसोड –पंढरपूर या बसच्या चालक– वाहकांनी नांदेड संभाजीनगर या बसच्या चालक वाहकाचा आदर्श घेतला तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ज्येष्ठ नागरिकांसाठी चालू केलेल्या मोफत प्रवासी योजनेचा खऱ्या अर्थाने लाभार्थ्यांना लाभ होईल व त्यांना सन्मानाने बसमध्ये प्रवास करता येईल . शिवाय एसटी महामंडळाचे उत्पन्न ही वाढेल .

त्यांना पंढरपूरला जाता आले नाही असे म्हणताच त्या वाहकाने बेल वाजवून बस थांबवली व पाच दहा मिनिटे वाद घालून नंतर बस परभणीकडे नेली. प्रवाशांना उद्धट व उलटून बोलण्यात वेळ घालवण्यापेक्षा जर बोरी बसथांब्यावर बस थांबवून पंढरपूरच्या प्रवाशांना बसमध्ये घेतले असते तर ते दोन प्रवासी रस्त्यावर पडले नसते शिवाय त्यांनी पंढरपूरला जाऊन विठ्ठलाचे दर्शन घेतले असते.

अशी मनमानी करणा-या वाहक चालकांना संबंधित अधिका-यांनी समज देणे गरजेचे आहे.

या घटनेच्या विरोधाभास असलेली दुसरी घटना त्याच दिवशी सायंकाळी घडली .

त्याचे असे झाले की, नांदेडहून छत्रपती संभाजीनगर कडे जाणारी एम एच 20 -बी 1 2008 ही बस परभणीहून निघाली असता रात्री सव्वा सातच्या सुमारास झरी ते शेक माक पाटीदरम्यान जात असताना रस्त्यावर एक बैलगाडी व दुचाकीस्वारांचा अपघात होऊन दुचाकीस्वार रस्त्यावर पडलेला व बैलगाडी रस्त्याच्या बाजूला गेलेली सदरील बसच्या वाहकाने पाहिली .

सामाजिक भावनेच्या दृष्टिकोनातून आपली बस थांबून त्या रस्त्यावर पडलेल्या दुचाकी स्वाराला प्रवाशांच्या सहकार्याने रस्त्याच्या बाजूला नेले. रस्त्यावर पडलेला त्याचा मोबाईल व पैसे त्याच्या खिशात ठेवले व अस्थायीपणे त्याची चौकशी केली. रस्त्याच्या खाली गेलेली बैलगाडी ही प्रवाशांच्या मदतीने वाहक व चालकाने रस्त्यावर आणली. बसमधील प्रवाशांनी व जाणाऱ्या येणाऱ्या वाहनातील नागरिकांनी या बसच्या चालक -वाहकाचे कौतुक केले.



# चैतन्य गर्जे फिरत्या चषकाचा मानकरी

## विजेत्यांना पारितोषिकांचे वितरण संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** कै. सुनील गोपीनाथ वायकर यांच्या स्मरणार्थ उदयनराजे'स गिगाबाईट कॉम्प्युटर टायपिंग, केडगाव यांच्या वतीने आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत केडगाव व परिसरातील 11 शाळा सहभागी झाल्या. रेसिडेन्शिअल चा विद्यार्थी चैतन्य गर्जे फिरता चषकाचा मानकरी ठरला. द्वितीय क्रमांक साईराम माने व तृतीय क्रमांक भाग्यश्री बांगर यांनी मिळविला.

स्पर्धेचे परीक्षक डॉ. भाऊसाहेब खांदवे व मारुती शेळके यांनी केले. कार्यक्रमास रवींद्र घाटे, जे. आर. पवार, प्रा. डॉ. रामकृष्ण बोडखे, नगर जिल्हा गणित व विज्ञान मंडळाचे अध्यक्ष संजयकुमार निक्रड, श्री अंबिका विद्यालय, जुनिअर कॉलेजच्या मते, एस. एस. मोहिते विद्यालयाच्या मुख्याध्यापिका जाधव उपस्थित होते. आपल्या वक्तृत्वशैलीने श्रोत्यांना आकर्षित व प्रभावित करून आपले विचार पटवून देण्याचे कौशल्य हे वक्तृत्व कलेत असते. वक्तृत्व हे एक शास्त्र असून ती एक उत्तम कलाही आहे. आपले विचार मांडत असताना देह बोली, हावभाव, आवाजातील चढ-उतार, समर्पक उदाहरण प्रभावी सुरुवात, अनुरूप प्रसंग निर्मिती, विनोदाची निर्मिती अचूक शब्द फेक, प्रेक्षकांना साजेस असा आशय या गोष्टी वक्त्याकडे सादरीकरणात असाव्यात. भाषणाची सुरुवात ही प्रभावी असेल तर श्रोत्यांचे लक्ष वेधून घेणे सहज शक्य होते. भाषणाचा मध्य हा विषयाचा गाभा असावा तर शेवट श्रोत्यांच्या मनावर चिरस्थानी ठसा उमटणारा असावा. शालेय विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्याच्या उद्दिष्टाने, उदयनराजेस गिगाबाईट कॉम्प्युटर टायपिंग केडगाव यांनी केलेले आहे. अशी माहिती संस्थेचे संस्थापक संचालक बाबासाहेब गोपीनाथ वायकर यांनी दिली. स्पर्धा यशस्वीतेसाठी नगर जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या विस्तार अधिकारी निर्मला साठे, रूपाली कार्ले, शैला वाबळे, सुकन्या पवार, संकेत लोखंडे, कोमल वायकर, आदित्य जाधव, ओंकार लिपाने यांनी विशेष परिश्रम घेतले.

# बल्लारपूर येथे थाटामाटात शिवजयंती

आधुनिक केसरी न्यूज

**बल्लारपूर :** येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त ३९४ जयंती भव्यदिव्य रॅली ढोलतास डीजे व पालकी मिरवणूक काढण्यात आली व पालकी मध्ये शिवाजी महाराज मूर्ती ठेऊन सुरुवात झाली व प्रत्येक चौक येथे विविध खानपान आयोजित केले होते. राजेंद्र प्रसाद वॉर्ड मसाला भात वाटप. विद्या नगर वॉर्ड मट्ठा वाटप. महाराणा प्रताप वॉर्ड बुंदी वाटप तर बालाजी वॉर्ड येथे स्मार्ट बाजार तर्फे कोल्डड्रिंग वाटप करण्यात आले होते. रॅलीला सुरवात डॉ राजेंद्र प्रसाद वॉर्ड इतून सुरुवात होऊन विद्यानगर वॉर्ड पंचशील चौक जयभिम चौक महाराणा प्रताप वॉर्ड बालाजी कॉम्प्लेक्स मार्गे पुराना बस्टॉप होऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज येथे समाप्त झाली. ही रॅली शिवप्रेमी छत्रपती शिवाजी महाराज उत्सव समिती तर्फे आयोजित केली होती. उपस्थित बल्लारपूर पोलीस निरीक्षक नवनियुक्त असिफरजा शेक यांना छत्रपती शिवाजी महाराज समिती तर्फे शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आले. समिती संस्थापक उमेश कुंडले. अध्यक्ष शुभम कंनोजवार. उपाध्यक्ष बादल मेश्राम. संदीप ताडुलवार विक्की माणुसमारे राहुल हेडाऊ चेतन मंगाम कार्तिक जिवतोळे गौरव नाडामवार निखिल मेकलवार सोनू तुरानकर योगेश चौधरी अनिल कश्यप योगेश हांडे प्रथम शेंडे मनीष कावळे शंकर ताडूलवार निलेश सोनटक्के संदीप शेंडे चिंटू पोतर्लावार संकेत खणके सुरज ताडूलवार सर्व शिवप्रेमी यांनी वेळेवर परिश्रम घेऊन रॅली काढण्यात योगदान दिले असून सर्वांन कडून उपस्थित सर्व शिवप्रेमी यांचे आभार मानले..





# सव्वा दोन लाखांचा गुटखा जप्त; गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** कोपरगाव तालुक्यातील कोळपेवाडी ग्रामपंचायत हद्दीत कोपरगाव तालुका पोलिसानी केलेल्या कारवाईत अनाधिकृत २.१९ लाखांचा गुटखा जप्त केला असून यातील आरोपी अश्पाक मेहबूब मणियार (वय-३०) रा.हनुमानगर कोपरगाव,वसीम चोपदार रा.दत्तनगर याचे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा विरुद्ध झाला असल्याची धक्कादायक माहिती उपलब्ध झाली आहे.

सदरचे सविस्तर वृत्त असे की, वर्तमानात कोपरगाव तालुक्यातील मोठ्या प्रमाणावर अवैध गुटखा बोकाळला आहे. त्यामुळे जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी या प्रकरणी स्वतंत्र पथक स्थापन कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत.या प्रकरणी कोपरगाव तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप कोळी यांनी पथक स्थापन करून संशियत जागी कारवाईसाठी रवाना केले होते. त्यांना गुप्त माहितीच्या आधारे दि.१९ फेब्रुवारी रोजी रात्री ०९ वाजेच्या सुमारास कारवाई केली असता कोपरगाव ते कोळपेवाडी रोडवर त्यांना मारुती सुझुकी (क्रं.एम.एच.०१ वाय.ए.०३४०) हि वसीम चोपदार याचे मालकीची असून त्यास अडवले व त्याची गाडीची झाडाझडती घेतली असता त्यात २.१९ लाखांचा बेकायदा गुटखा आढळून आला आहे. दरम्यान या कारवाईत शिर्डी उपविभागीय पोलीस अधीकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नीं.संदीप कोळी, पोलीस उपनिरीक्षक समाधान भाटेवाल, महेश कुसारे, सहाय्यक पोलीस निरीक्षक गजानन वांढेकर, सुरेश गागरे,पो.ना.विलास कोकाटे,अविनाश तमनर, पो.कॉ.अंबादास वाघ,पो.कॉ.अनिश शेख आदींच्या पथकाने कामगिरी बजावली आहे.

दरम्यान या प्रकरणी कोपरगाव तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप कोळी यांनी भेट दिली आहे.

दरम्यान या प्रकरणी फिर्यादी पो.कॉ.अविनाश अशोक तमनर यांनी आरोपी अश्पाक मेहबूब मणियार याचे विरुद्ध गुन्हा क्रं.४६/२०२४ भा.द.वि.कलम ३२८,१८८,२७२,३७३,३४ प्रमाणे दाखल करण्यात आला होता.त्याचा तपास पुढील तपास पोलीस निरीक्षक कोळी यांचे मार्गदर्शनाखाली पो.हे.कॉ. तमनर हे करत आहे.

दरम्यान आणखी एका कारवाईत तालुका पोलिसांनी कोळपेवाडी ग्रामपंचायत हद्दीत दुपारी ३.४५ वाजेच्या सुमारास केलेल्या कारवाईत सोरट नावाचा अवैध जुगार अड्ड्यावर छापा टाकून त्यात मॉन्टी उर्फ मनोज दिलीप मथुरे (वय-३२) रा.मुंदेलखुला ता.येवला यांचे विरुद्ध कारवाई करत त्याच्या ताब्यातील ४० हजार ५२० रुपयांचा अवैज जप्त केला आहे व त्याच्या विरुद्ध गुन्हा क्रं.४५/२०२४ महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२(अ) प्रमाणे दाखल केला आहे.पुढील तपास पोलीस हे.कॉ. गजाजन वांढेकर हे करत आहे.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार

किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर